दैनिक
# लोकविजय
संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

## पाटबंधारे अभियंत्याच्या घरावर एसीबीचा छापा; सापडले मोठे घबाड

बीड दि.२३ (प्रतिनिधी)- बीडच्या माजलगाव पाटबंधारे विभागात कार्यकारी अभियंता असलेले राजेश सलगर यांच्यावर लाच घेतल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून कारवाई सुरू असतांनाच त्यांच्या घराची झाडाझडती घेतली असता ११ लाख रुपये रोख स्वरूपात आढळून आलेत. तर ३० ग्रॅम सोने, ३ किलो ४०० ग्रॅम चांदी असा लाखोंचा मुद्देमाल कारवाईत जप्त करण्यात आला आहे. गाळ उपसा परवानगी देण्यासाठी एका शेतकऱ्याकडून २८ हजार रुपयांची लाच स्वीकारताना एसीबीने राजेश सलगर यांना रंगेहात पकडले होते. याच अनुषंगाने त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे.

राजेश सलगर हे परळीतील गजानन इमारतीमध्ये राहतात. एसीबीच्या पथकाने गुरुवारी सकाळी त्यांच्या घरावर छापा टाकला. पंचासमक्ष त्यांच्या घराची झडती घेण्यात आली. यावेळी लाचलुचपत प्रतिबंधक अधिकाऱ्यांनी छापा टाकत कारवाई केली. उपअधीक्षक शंकर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक गुलाब बाचेवाड, अंमलदार सुरेश सांगळे, सुदर्शन निकाळजे , स्नेहलकुमार कोरडे आणि गणेश मेहेत्रे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

(वर्ष ६३ वे अंक १३७) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२३ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार, दि.२४ मे २०२४ (पाने ४) (किंमत २ रूपये)

# केमिकल कंपनीत स्फोट; सात जणांचा होरपळून मृत्यू

## डोंबिवली एमआयडीसीतील दुर्घटना; ४५ जण जखमी, मृतांचा आकडा वाढण्याची भीती

मुंबई दि.२३ (प्रतिनिधी)- डोंबिवली एमआयडीसी केमिकल कंपनीत आज दुपारी २ च्या सुमारास बॉयलरचा भला मोठा स्फोट आणि त्यानंतर छोटे स्फोट झाले. या घटनेत सात कामगारांचा मृत्यू झाला आहे. तर ४८ जण जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी विविध खासगी रुग्णाल यांमध्ये दाखल करण्यात आलं आहे. घटनास्थळी आगीचे लोळ आणि धुराचे लोट मोठ्या प्रमाणावर येत होते. नागरिकांनाही या घटनेचा मोठ्या प्रमाणावर त्रास झाला. या दुर्घटनेतील मृतांची संख्या वाढण्याची भीती आहे. उद्योगमंत्री उदय सामंत, खासदार श्रीकांत शिंदे यांनी घटनास्थळी जाऊन बचावकार्याची माहिती घेतली आणि पुढील निर्देश दिले.

डोंबिवलीतील एमआयडीसी फेज दोन मध्ये अंबर केमिकल कंपनीत दुपारी २ ते २.३० च्या सुमारास बॉयलरचा स्फोट झाला. या स्फोटाचे हादरे तीन ते चार किलोमीटर परिसरात जाणवले. यामुळे इमारतींच्या काचाही फुटल्या तसंच काही चार चाकी वाहनांचे नुकसान झालं आहे. आग नियंत्रणात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरु आहेत. धुराचे लोट आणि आगीचे लोळ मोठ्या प्रमाणावर असल्याने बचाव कार्यात अडथळे येत होते. या घटनेत सात जणांचा मृत्यू झाला आहे. उद्योगमंत्री उदय सामंत यांनी तीन मृत्यू झाल्याची माहिती दिली होती. मात्र उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेत सात जणांचा मृत्यू झाल्याची माहिती दिली आहे. एक्स पोस्ट करत देवेंद्र फडणवीस यांनी ही माहिती दिली आहे.

भीषण स्फोटानंतर एमआयडीसीतून बाहेर पडलेल्या एका कामगाराने सांगितलं की, स्फोट झाला ती आमच्या बाजूची कंपनी होती. इतका मोठा स्फोट होता की, आम्ही सगळे बाहेर पडलो. सगळे आगीचे लोळ येत होते. आमच्या हाताला भाजले आहे, असं कामगाराने एका चॅनलला सांगितलं. काही प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, मोठे स्फोट झाले, दोन ते तीन किलोमीटरपर्यंत हादरे जाणवले. अनेकांच्या घरांच्या खिडक्यांच्या काचा फुटल्या आहेत. अग्निशमन दलाकडून अतिरिक्त कुमक मागवून आग विझविण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरु असल्याचंही त्यांनी सांगितलं.



अंबर केमिकल कंपनीच्या परिसरातील अनेक इमारतींच्या घराच्या काचा तावदाने फुटली आहेत.: काही पादचारी राखेने माखले आहेत. काही कुटुंब आपल्याला लहान मुलांसह रस्त्याने चालत होती. यावेळी स्फोट झाल्याने 'मुले घाबरून मोठ्याने रडू लागली. चालत असताना वरून राखेचा वर्षाव होऊ लागल्याने पादचारी वाहन चालक घाबरले होते.

दरम्यान या दुर्घटने प्रकरणी आमदार जितेंद्र आव्हाड यांनी अनेक शंका उपस्थित केल्या आहेत. ''एमआयडीसीने या संदर्भात फायर ऑडिट केलं होतं का? हा प्रश्न आहे. कारण महाराष्ट्र सरकारचं हे डिपार्टमेंट फायर ऑडिट करत नाही. दोन वर्षांपूर्वीही स्फोट झाला होता. काय उपाय योजना केल्या आहेत? एमआयडीसीने किती कंपन्याचं फायर ऑडिट केलं आहे? त्याची श्वेतपत्रिका काढावी. एमआयडीसी हे फक्त पैसे खाण्याचं काम करते आहे.'' असा आरोप जितेंद्र आव्हाड यांनी केला.

### रसायन तयार करणाऱ्या कंपन्या शहराबाहेर असाव्यात

बॉयलरचा स्फोट झाला आहे. त्यामुळे कंपनीत आग लागली आहे. आम्ही जिल्हाधिकाऱ्यांशी बोललो आहोत. जखमींना आम्ही विविध रुग्णालयात दाखल केलं आहे. ४८ जण या घटनेत जखमी झाली आहे. अतिधोकादायक रसायनं तयार करणाऱ्या कंपन्या शहराच्या बाहेर नेल्या जाव्यात अशी मागणी स्थानिकांकडून केली जाते आहे. आम्ही यासंदर्भात पुढच्या आठवड्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उद्योग मंत्री उदय सामंत यांच्याशी आम्ही चर्चा करुन याविषयीचा निर्णय घेऊ. येत्या सहा महिन्यांत इथल्या अतिधोकादायक केमिकल तयार करणाऱ्या कंपन्या शहराबाहेर कशा नेता येतील यावर आम्ही लक्ष केंद्रीत करणार आहोत. असं श्रीकांत शिंदेंनी म्हटलं आहे.

## बुडालेल्यांचा शोध घेण्यासाठी गेलेल्या एनडीआरएफच्या तीन जवानांचा मृत्यू

अहमदनगर दि.२३ (प्रतिनिधी)- नगर जिल्ह्यातील प्रवरा नदीच्या पात्रात पोहण्यासाठी गेलेले दोघे जण पाण्यात बुडाले होते. त्यांच्या शोधासाठी गेलेली धुळ्यातील एसडीआरएफच्या पथकातील एक बोट बुडाल्याने दोन जवानांसह एका अधिकाऱ्याचा मृत्यू झाल्याची खळबळजनक घटना घडली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, प्रवरा नदीत बुडालेल्या युवकाचा शोध घेण्यासाठी आलेल्या धुळे येथील एसडीआरएफ पथकाची बोट आज सकाळी उलटली. या पथकातील चार जण आणि स्थानिक असे पाच जण प्रवरा नदी पात्रात बुडाले. यातील तीन जणांचे मृतदेह सापडले असून अन्य दोन जणांचा शोध सुरू आहे. काल बुधवारी दुपारी अकोले तालुक्यातील सुगाव बुद्रुक येथे प्रवरा नदीपात्रात पोहण्यासाठी गेलेले सागर पोपट जेडगुले (२५) व अर्जुन रामदास जेडगुले (१८) हे दोघे तरुण बुडाले होते. त्यातील सागर जेडगुले याचा मृतदेह बुधवारी सापडला तर अर्जुन जेडगुले याचा शोध सुरू होता. या तरुणाचा शोध घेण्यासाठी एसडीआरएफचे पथक घटनास्थळी दाखल झाले.

या तरुणाचा तपास सुरू असतानाच शोध पथकाची बोट उलटून पथकातील पाच जण आणि स्थानिक युवक (पान ४ वर)

## आणखी एक प्रकल्प परराज्यात; अंबादास दानवेंचा सरकारला खडा सवाल

छत्रपती संभाजीनगर दि.२३ (प्रतिनिधी)- राज्यातील आता आणखी एक प्रकल्प परराज्यात जाणार असल्याचा आरोप करत विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी राज्य सरकारवर निशाणा साधला आहे. यासंदर्भात त्यांनी थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उद्योगमंत्री उदय सामंत यांना प्रश्न केला आहे. या संदर्भात त्यांनी एक ट्विट केले आहे.

या ट्विटमध्ये त्यांनी सरकारला अनेक प्रश्न केले आहेत. महाराष्ट्राच्या छत्रपती संभाजीनगर किंवा दाभोळ येथे ५० हजार कोटींची गुंतवणूक करून इथेन क्रॅकिंग युनिट उभारणार होते. आता हा प्रकल्प महाराष्ट्रात न येता मध्यप्रदेशच्या सिहोर येथे उभारला जाणार आहे. हा प्रकल्प महाराष्ट्राचा विचार करत असताना मध्य प्रदेशात कसा गेला? महाराष्ट्राचा वाट्याला येणारा रोजगार असा सहज बाहेर कसा गेला? याचे उत्तर द्या, असे म्हणत त्यांनी उद्योगमंत्री उदय सामंत, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना लक्ष्य केले आहे.

## उजनी धरणात बुडालेल्या ६ जणांचे मृतदेह सापडले

सोलापूर दि.२३ (प्रतिनिधी)- उजनी धरणाच्या भीमा नदी पात्रात २१ मे रोजी सायंकाळी बोट दुर्घटनेत बुडालेल्या ६ जणांचे मृतदेह अखेर सापडले आहेत. चाळीस तासांच्या शोध मोहिमेनंतर आज गुरुवारी त्यांना हे मृतदेह सापडले आहेत. यात दोन लहान मुलांसह दोन पुरुष आणि दोन महिलांचा समावेश आहे. यावेळी बुडालेल्या लोकांचे नातेवाईक तिथेच बसून होते. मात्र मृतदेह बाहेर काढताच त्यांनी एकच हंबरडा फोडला. दरम्यान त्यांचे मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी करमाळा ग्रामीण रुग्णालयात पाठवले असून त्यानंतर नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात येणार आहेत.

उजनी धरण पात्रात मंगळवारी संध्याकाळच्या सुमारास वादळी वारा सुटला होता. या वादळी वाऱ्यात पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यातील कळाशीहून करमाळा तालुक्यातल्या कुगावकडे ही बोट जात होती. मात्र अचानक वाऱ्याचा वेग वाढल्यामुळे बोट उलटी झाली, या बोटीमधले सहा जण बुडाले होते. यात कुगाव येथील पोलीस उपनिरीक्षक राहुल डोंगरे यांना पोहता येत असल्याने ते बचावले आणि त्यांनी पोहत पाण्याबाहेर येऊन ही घटना सांगितली होती. बेपत्ता लोकांमध्ये दोन लहान मुलांसह तीन महिला आणि दोन पुरुष यांचा समावेश आहे. मंगळवार संध्याकाळपासून त्यांची शोधमोहिम सुरु करण्यात आली होती. उजनी धरणाच्या भीमा नदी पात्रात मंगळवारी बुडालेली प्रवासी बोट (पान ४ वर)

## उद्धव ठाकरेंच्या 'त्या' पत्रकार परिषदेची केंद्रीय निवडणूक आयोगाकडून दखल

मुंबई दि.२३ (प्रतिनिधी)- मुंबईत सोमवारी मतदानाच्या दिवशी पत्रकार परिषद घेतल्याने ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे. कारण केंद्रीय निवडणूक आयोगाने उद्धव ठाकरे यांच्या या पत्रकार परिषदेची चौकशी करण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगाला दिले आहेत. भाजप नेते आशिष शेलार यांनी यासंदर्भात तक्रार केली होती.

मिळालेल्या माहितीनुसार, भारतीय निवडणूक आयोगाने उद्धव ठाकरे यांच्याविरोधात भाजपने केलेल्या तक्रारीची दखल घेतली आहे. निवडणूक आयोगाने उद्धव ठाकरेंनी सोमवारी पत्रकार परिषदेत केलेल्या वक्तव्याचा अनुवाद मागवला आहे. निवडणूक आयोग उद्धव ठाकरेंची संपूर्ण पत्रकार परिषद तपासून पाहणार आहे. तसेच उद्धव ठाकरे यामध्ये काय म्हणाले आणि त्यांनी निवडणूक आचारसंहितेचा भंग केला आहे का, (पान ४ वर)

## शरद पवार यांना सुप्रिया सुळे यांच्या विजयाचा ठाम विश्वास

मुंबई दि.२३ (प्रतिनिधी)- बारामती लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या उमेदवार सुप्रिया सुळे यांच्या विजयाची खात्री असल्याचा दावा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केला आहे. पण सोबतच यंदा प्रथमच मतदारसंघात पैशाचा अमाप वापर झाल्यावर त्यांनी चिंताही व्यक्त केली आहे.

बारामती लोकसभा मतदारसंघातील लढतीकडे अवघ्या राज्याचे लक्ष लागले आहे. याठिकाणी शरद पवार यांच्या कन्या खासदार सुप्रिया सुळे यांचा सामना उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांच्याशी होणार आहे. गत ७ मे रोजी निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यात येथे निवडणूक झाली. त्यानंतर आता शरद पवार यांनी एका यूट्यूब चॅनलशी बोलताना सुप्रिया सुळे यांच्या विजयाचा विश्वास व्यक्त केला आहे. तसेच विजयाविषयी साशंकताही व्यक्त केली आहे.



बारामतीत विजयाची खात्री असायला हरकत नाही. पण येथे आतापर्यंत केव्हाच पैशांचा वापर झाला नव्हता. परंतु या निवडणुकीत पैशांचा अमाप वापर झाला असे लोक सांगत आहेत. आता त्याचा परिणाम किती होईल हे आज सांगता येत नाही, असे शरद पवार यांनी म्हटले आहे. पवारांनी यावेळी लोकसभा निवडणुकीनंतर सत्ता स्थापन करण्यासाठी भाजपला जागा कमी पडल्या तर त्यांच्याशी युती करणार नसल्याचेही जोर देऊन सांगितले आहे. तसेच उद्धव ठाकरेही भाजपसोबत जाणार नसल्याचा विश्वास व्यक्त केला आहे.

शरद पवार यांनी यावेळी विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस अधिकाधिक जागा घेईल असा इशाराही काँग्रेस व शिवसेनेच्या ठाकरे गटाला (पान ४ वर)

## आमदार पी. एन. पाटील अनंतात विलीन

कोल्हापूर दि.२३ (प्रतिनिधी)- कोल्हापूर जिल्ह्यातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, प्रदेश काँग्रेस उपाध्यक्ष करवीरचे आमदार पी. एन. पाटील आज (२३ मे) अनंतात विलीन झाले. सडोली खालसा या मुळ गावी पाटील यांच्यावर हजारोंच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. राहुल पाटील यांनी पाटील यांच्या पार्थिवाला अग्नी दिला. रविवारी राहत्या घरी बाथरुममध्ये पाय घसरून पडल्यानंतर मेंदूत रक्तस्त्राव झाला होता. यानंतर कोल्हापुरात खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तातडीची शस्त्रक्रिया केल्यानंतर त्यांची प्रकृती स्थिर पण गंभीर होती. मात्र, गेल्या पाच दिवसांपासून सुरु असलेली मृत्यूची झुंज अपयशी ठरली.

राज्य सरकारच्या वतीने उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी श्रद्धांजली वाहिली. जिल्हा प्रशासनाकडून जिल्हाधिकारी, जिल्हा पोलिस अधीक्षकांनी श्रद्धांजली वाहिली. अंत्यसंस्कारावेळी मंत्री चंद्रकांतदादा पाटील, खासदार धनंजय महाडिक, शाहू छत्रपती महाराज, संभाजीराजे, मालोजीराजे उपस्थित होते.

## पंतप्रधान मोदींच्या 'त्या' दाव्यावर राहुल गांधींची टीका

नवी दिल्ली दि.२३ (वृत्तसंस्था)- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वाराणसी येथे उमेदवारी अर्ज भरत असताना एका वृत्तवाहिनीला मुलाखत दिली होती. या मुलाखतीमध्ये त्यांनी स्वतःच्या जन्माबाबत केलेला दावा आता चर्चेचा विषय ठरत आहे. पंतप्रधान मोदी म्हणाले, 'मी आता या निष्कर्षापर्यंत पोहोचलो आहे की, माझा जन्म जैविकदृष्ट्या झालेला नाही. मला ईश्वराने त्याचे कार्य पूर्ण करण्यासाठी पाठविले आहे.' मोदींच्या या विधानावर आता राहुल गांधी यांनी जोरदार टीका केली आहे. एका प्रचार सभेत बोलत असताना राहुल गांधी म्हणाले की, एखादा सामान्य माणूस जर असे बरळला असता, तर त्याच्याशी आपण कसे वागलो असतो. पण पंतप्रधान मोदी हे आता काहीही बोलू लागले आहेत.

'देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी चमच्यांना मुलाखत देत असताना बिनधास्त म्हणतात की, ते जैविकरित्या जन्मलेले नाहीत. तर त्यांना देवाने एका ध्येयासाठी पाठविले आहे. रस्त्यावर जर एखाद्या सामान्य माणसाने आपल्याला असे म्हटले तर आपण त्याला काय बोलणार? आपण म्हणू की, 'माफ कर बाबा, पुढं जा. पण मोदींचे चमचे मात्र त्यांच्या अजब विधानांची प्रशंसा करतात, त्यावर वाह-वाह म्हणतात', अशी टीका राहुल गांधी यांनी केली. राहुल गांधी पुढे म्हणाले, 'करोना काळात गंगा नदीत शव वाहत होते. यमुनेच्या तिरावर मृतदेह अंत्यसंस्काराविना पडले होते. रुग्णालयाच्या दारातच रुग्ण जीव सोडत होते, अशा भीषण परिस्थितीत ज्यांना देवाने पाठविले आहे, ते काय म्हणायचे? ते म्हणायचे, तुमच्या मोबाइलची टॉर्च सुरू करा. युवक जेव्हा रोजगार मागतात, तेव्हा देवाचे अवतार म्हणतात की, गटारात पाईप टाकून त्यातील जो गॅस आहे, त्यापासून भजे तळा. आम्ही देवाला विचारतो, देवा असा कसा माणूस पाठवलास अशी टीका राहुल गांधी यांनी केली.

## अरूण गवळी यांच्या सुटकेला राज्य सरकारचा विरोध

मुंबई दि.२३ (प्रतिनिधी)- कुख्यात गुंड अरूण गवळी यांच्या सुटकेला राज्य सरकारने विरोध दर्शवला आहे. राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात या विरोधात याचिका दाखल केली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने गृहविभागाला चार आठवड्यांमध्ये निर्णय घ्यायचे आदेश दिले होते. या निर्णयाविरोधात गृहविभागाने सर्वोच्च न्यायालयात गवळीच्या मुदतपूर्व सुटकेला विरोध केला आहे. वास्तविक लोकसभा निवडणुकीच्या आधी अरुण गवळीची सुटका झाल्यामुळे महाआघाडीच्या नेत्यांनी भाजपवर आरोप देखील केले होते. आता गृहविभागाने या विरोधात याचिका दाखल केल्यामुळे अरुण गवळी यांच्या अडचणी पुन्हा वाढण्याची शक्यता आहे.

कुख्यात गुंड अरुण गवळी यांच्या कन्या आणि माजी नगरसेविका गीता गवळी यांना महापौर होईपर्यंत साथ देण्याचे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर (पान ४ वर)

## पोर्शे कार अपघात प्रकरण; गुन्हा दाबण्याच्या डीलमध्ये पोलिस आयुक्ताचा सहभाग-रवींद्र धंगेकर

पुणे दि.२३ (प्रतिनिधी)- पुणे पोर्शे कार अपघातात २ ते ३ जणांची नावे पद्धतशीरपणे गायब करण्यात आल्याचा मोठा आरोप काँग्रेस आमदार रवींद्र धंगेकर यांनी केला आहे. त्यांनी या प्रकरणी पुण्याचे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले आहे. या प्रकरणात एवढ्या गंभीर चुका होऊनही कमिश्नरनी कुणावरही कारवाई केली नाही. याचा अर्थ हा गुन्हा दाबण्याच्या डीलमध्ये त्यांचाही सहभाग आहे, असे ते म्हणालेत. धंगेकरांनी या प्रकरणी पोलिस आयुक्तांच्या उचलबांगडीची मागणी केली आहे.

आमदार रवींद्र धंगेकर यांनी या प्रकरणी एक विस्तृत ट्विट केले आहे. त्यात त्यांनी पुणे पोर्शे कार अपघाताचे संवेदनशील पदर उलगडून दाखवले आहेत. रवींद्र धंगेकर आपल्या ट्विटमध्ये म्हणतात की, ज्याने आमच्या पुण्यनगरीची इतकी बदनामी झाली,असा पोलीस कमिश्नर आम्हाला नको. कल्याणीनगर दुर्घटनेत अगोदर जामीन मिळालेल्या बिल्डरच्या मुलाला काल कोर्टाने १४ दिवसांची रिमांड होमची कस्टडी मिळणे हे आपण दिलेल्या लढ्याला मिळालेले पाहिले यश आहे. जर आपण सर्वांनी आवाज उठवला नसता तर हे प्रकरण दाबले गेले होते.

आता खरं या व्यवस्थेतील कचरा साफ करण्याची वेळ आहे.त्याची सुरुवात पोलिस कमिशनर यांच्या पासून करायला हवी. या प्रकरणात इतक्या गंभीर चुका होऊनही कमिश्नरने कुणावरही कारवाई केलेली नाही, याचाच अर्थ असा होतो हा गुन्हा दडपण्याच्या ''डिल'' मध्ये कमिशनर देखील सहभागी आहेत, त्यामुळे त्यांचे तातडीने बदली करण्यात यावी, अशी मागणी मी राज्याच्या गृहमंत्र्यांना करत आहे. या प्रकरणात पोलीस कमिश्नर यांच्यावर संशय निर्माण करणाऱ्या बाबी समोर आल्या आहेत असे ते म्हणाले.

# झाडे लावा; झाडे जगवा, वाढवा!

यावर्षीच्या उष्णतेने कोकणाला अशा काही झळा दिल्या आहेत की, यामुळे उष्णतेने काय आणि किती त्रास होऊ शकतो हेच दाखवून दिले आहे. कोकणात गेल्या काही वर्षांमध्ये बेसुमार वृक्षतोड करण्यात आली आहे. मुंबई-गोवा महामार्गावर येणारी सर्व झाडे तोडण्यात आली. ज्या प्रमाणात वृक्षतोड झाली आहे त्याच्या पंचवीस टक्के इतकीही लागवड करण्यात आली आहे. दरवर्षी महाराष्ट्रात एक कोटी, दोन कोटी, दहा कोटी वृक्ष लागवड केल्याची आकडेवारी मंत्रालयस्तरावर जाहीर केली जाते. सरकार कोणतेही आणि कोणत्याही पक्षाचे असोत १० कोटी वृक्ष लागवड केल्याचा दावा केला जातो; परंतु प्रत्यक्षात किती लागवड होते हे जनतेला चांगलच ठाऊक आहे. सामाजिक वनीकरण विभाग हा केवळ वृक्ष लागवड, वृक्षसंवर्धनासाठी आहे.

खरंतर या विभागाचा कारभार हा पूर्णपणे कागदावरचा कारभार आहे. प्रत्यक्षात जमिनीवर काहीच नसतं. जर एवढ्या मोठ्या प्रमाणावर झाडं लावली जात असतील, तर कोकणात गर्द झाडी तयार झाली असती; परंतु दुर्दैवाने कोकणच नव्हे तर महाराष्ट्रात तसं चित्र नाही. घाटमार्गाने प्रवास करतानाही घाटांमध्ये असणारी, दिसणारी गर्द झाडी आज कुठे दिसत नाही. डोंगर उजाड झाले आहेत. जुनाट झाडं तर केव्हाचीच नष्ट झाली आहेत. गावठी आंब्याचे मोठाले वृक्ष आज कुठे दिसत नाहीत. वटवृक्षाच्या छायेखाली आपण सर्वजण विसावत होतो; परंतु आता तर ग्रामीण भागात कुठे दोन-पाच वडांची झाडं दिसली तरी आनंद वाटतो. तो गार वारा, वडा-पिंपळांची झाडं एकत्र वाढलेली असतील, तर त्यांची सावली आणि त्यांना प्राप्त होणारं देवत्व सारंच आनंददायं असतं; परंतु हा सारा भुतकाळ झालायं की काय अशीच सध्याची परिस्थिती आहे. गेल्या वीस-पंचवीस वर्षांत आपण वृक्षतोड करून सिमेंटचं जंगल वाढवलंय. बाकी काही नाही. जागो-जागी टोलेजंग इमारती उभ्या राहिल्यात; परंतु त्या इमारती उभ्या करताना सभोवती चार झाडं लागतील याची काळजीच कोणी घेतलेली नाही. यामुळे बेसुमार वृक्षतोड होत राहिली. जे निर्बंध आहेत ते कागदावरच आहेत. यामुळे वृक्ष लागवड ही सक्तीचीच असायला हवी.

वाडवडिलांनी जोपासलेली, वाढवलेले झाड आपण तोडतो आणि आपलं गाव, आपला परिसर उजाड करतोयं. वृक्ष लागवडीसारखा विषय कोणताही राजकीय पक्ष आपल्या अजेंड्यावर घेत होत नाही की त्याची साधी चर्चाही करत नाहीत हे दुर्दैव आहे. या अशा सामाजिक विषयांना हातात घेऊन एक मिशन म्हणून राबविण्याची कुठल्या संस्थेची इच्छा नाही की, त्यासाठीचे आवश्यक असणारे अथक परिश्रम करण्याची कोणाची मानसिकताही नाही. यामुळे अजिबातच कोणतीच सामाजिक संस्था काही करत नाहीत, असं मी म्हणणार नाही. निदान फोटो काढण्यासाठी का असेना रोपाला हात लावून फोटो काढण्यासाठी फार मोठी स्पर्धा तर समाजात नेहमीच सुरू असते. वनविभागाच्या शासन मालकीच्या जंगलातही मोठ्या प्रमाणावर जंगलतोड होते.

वनविभागाचे कर्मचारी, अधिकारी आणि काही लाकूड व्यावसायिक यांच्यातील समझोत्याने चालणारा हा मामला असतो. किती वृक्ष तोडले याची रितसर परवानगी असते आणि प्रत्यक्षात किती जंगल तोड होते हे सर्व वनविभागाच्या अधिकारी, कर्मचारी यांना पूर्ण माहिती असते. एकाच लाकूड पासवर दोन-तीन ट्रीप आरामात होऊन जातात. हे सर्व राजरोस, सर्वसहमतीने चालू असते. ज्या सर्व्हे नंबरमध्ये नवीन लागवड करण्यासाठी ही तोड केली जाते. त्याच्या भलत्याच सर्व्हेनंबरमधील वृक्ष तोडले जातात. अशा कितीतरी गोष्टी घडतात. हे थांबलच पाहिजे. बेफाट वृक्षतोडीचे जे परिणाम आहेत ते परिणाम हे आज जरी दुर्लक्षित करण्यासारखे कोणाला वाटत असले तरीही त्याचे फार दूरगामी परिणाम आपणाला निश्चितच सोसावे, भोगावे लागतील. यावर्षी जो उन्हाळा कोकणामध्ये जाणवला आजवर तेवढी परिणामकारकता कधीच नव्हती. त्याची प्रमुख कारणांमध्ये 'ग्लोबल वॉर्मिंग' हे जसं कारण पुढे केलं जातं तसं कोकणात होणारी भरमसाट वृक्ष लागवड हे देखील एक कारण आहे. ज्या प्रमाणात वृक्षतोड झाली आहे, त्याच्या दुप्पट प्रमाणात कोकणात वृक्ष लागवड व्हायला हवी.

या वृक्ष लागवडीमध्ये रायवळ आंबा, चिंच, जांभूळ, फणस याच्या बिया जरी टाकल्या तरीही भविष्यात ही जुन्या आठवणी असणारी झाडं उभी राहतील. पावसाळा सुरू होतोय. कोकणातील जनतेने ज्या ठिकाणी मोकळी जागा असेल, माळरान असतील, डोंगर असतील त्याठिकाणी या बिया टाकायला काहीच हरकत नसावी. आपण टाकलेल्या बियांतून भविष्यात त्याची फळं कोणीही खाल्ली तरीही वाढणारे वृक्ष पाहून निश्चितच आपणाला आनंद मिळेल. रायवळ आंबा, फणस यांच्या कोणी बागायती उभ्या करणार नाही. याचे कारण त्यातून मिळणारे उत्पादन, त्याचा होणारा खर्च, उत्पादन मिळायला लागणारा कालावधी या सर्वांचा विचार करता कशाचाच ताळमेळ घालता येत नाही. तरीही हे नेहमी उत्पन्न मिळू शकते; परंतु तसा प्रयोगही कोणी केलेला नाही. शेवटी आर्थिकदृष्ट्या जे परवडणारे आहे त्याचाच विचार कोणीही शेतकरी करणार. ओसाड, पडीक असलेल्या जमिनींवर, माळरानांवर अशी लागवड करायला हरकत नाही.

ज्या जमिनीवर काहीच उगवणार नाही म्हणून सांगितले जात असेल, तर हा प्रयोग करणे अधिक योग्य ठरेल. यावर्षी पाण्याची तीव्र टंचाई झाली. पुढील वर्षांमध्ये त्याचे प्रमाण वाढत जाऊ शकते. ही धोक्याची घंटा वेळीच ओळखून आपल्याकडून होणारे किमान प्रयत्न आपण करायलाच हवेत. नव्याने रोपं लावली पाहिजेत. त्याचं संगोपन केलं पाहिजे. ती वाढवलीही पाहिजेत.

# ग्रामीण भारताचा वैद्यकीय दीपस्तंभ - टेलिमेडिसिन सुविधा

भारतासारख्या १४० कोटी लोकसंख्या असलेल्या आणि भौगोलिकदृष्ट्या वैविध्यपूर्ण देशात वैद्यकीय सुविधा प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचविणे, हे एक आव्हान आहे. शहरांमध्ये वैद्यकीय सुविधा उपलब्ध होणे तुलनेने सुलभ आहे, पण ६६ टक्के जनता ज्या ग्रामीण भारताचे प्रतिनिधित्व करते, तिथे आजही प्राथमिक वैद्यकीय सुविधा तळागाळापर्यंत पोहोचवणे महाकठीण आहे.

महाराष्ट्रातील अनेक दुर्गम गावे, वाड्या व वस्त्यांमध्ये, जिथे मूलभूत सुविधा मिळविण्यासाठी संघर्ष करावा लागतो, तिथे आरोग्य सुविधा मिळणे तर दुरापास्तच! बहुतांश गावांतील स्त्री-पुरुष शेतमजूर म्हणून रोजंदारीवर काम करतात. रोजच अर्धपोटी राहणाऱ्या या लोकांना स्वतःच्या आरोग्याची काळजी घेता येणे शक्य नसते. जगण्याचा संघर्षच एवढा मोठा असतो की, त्यापुढे बाकी सारे काही मागे पडते. अशात छोट्यामोठ्या आजारांमुळे जर रोजगार बुडला तर अख्खे घरच उपाशी राहते.

अशावेळी आजार लपवण्याकडे किंवा दुखणे अंगावर काढण्याकडेच कल असतो. आणि असे केल्याने जर आजार बळावला तर त्या कुटुंबाला कोणी वाली नसतो. कारण गावात एक तर कायमस्वरूपी डॉक्टर नसतात. आणि तालुक्याच्या ठिकाणी जाण्यासाठी जवळ पैसा नसतो. घरातील लहान मुले आजारी पडली तरी रोजगार मिळवण्यासाठी कामावर जावेच लागते.

### शासकीय स्तरावरील प्रयत्न

अशा अत्यंत गरीब आणि कोणत्याच सुविधांचे वारे न लागलेल्या असहाय्य जनतेच्या आरोग्यरक्षणासाठी शासनाने विविध कल्याणकारी योजना सुरू केल्या आहेत. देशभरात ठिकठिकाणी तब्बल १,५०,००० आरोग्य कल्याण केंद्रे स्थापन करून शासन सर्वसामान्य जनतेला सार्वजनिक आरोग्य सुविधांच्या कक्षेत आणण्याचा प्रयत्न करीत आहे. सर्व वयोगटातील लोकांचे आरोग्य चांगले राहावे, या हेतूने प्रतिबंधात्मक आणि आरोग्याला चालना देणारा आरोग्यविषयक सजग दृष्टिकोन बाळगण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. वरील आरोग्य कल्याण केंद्रे दुर्गम भागांसहित संपूर्ण ग्रामीण भागातील लोकांना सर्वांगीण आरोग्य सुविधा पुरवतात, ज्यामध्ये रुग्णसेवा, नवजात शिशु व मातेची आरोग्यविषयक देखभाल अशा सुविधांचा समावेश असतो.पण शासनाचे हे उपायही कोविड १९ साथीच्या काळात अतिशय तोकडे पडले. २०१९-२० मध्ये कोविड महामारीने जगभर थैमान घातले होते. जिथे विकसित देशांतील आरोग्य सुविधाही अपुऱ्या पडल्या, तिथे अफाट लोकसंख्या आणि वैद्यकीय सुविधांचे जाळे विकसित नसलेल्या भारताची परिस्थिती काय झाली असेल? पण सरकारने याच काळात टेलिमेडिसिन क्षेत्राला अधिकृत मान्यता दिली व वैद्यकीय सुविधा तळागाळापर्यंत पोहोचवण्याचा मार्ग प्रशस्त केला.

### ग्रामीण महाराष्ट्र आणि भारत फोर्ज

भारत फोर्जचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक बाबासाहेब कल्याणी यांची मूळ कौटुंबिक पार्श्वभूमी खेड्यातील असल्याने ग्रामीण भागातील विविध समस्यांविषयी त्यांना जाण आहे व त्या सोडवण्यासाठी ते नेहमीच पुढाकार घेतात. महाराष्ट्रातील ग्रामीण भागांतील जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने सीएसआर प्रकल्पांतर्गत भारत फोर्जने निवडक १०० गावांतील सोयी सुविधांकडे विशेष लक्ष देण्याचे ठरवले. पाणी, शिक्षण, पायाभूत सुविधा, आरोग्य आणि रोजगार यांबाबत ही गावे स्वयंपूर्ण होण्यासाठी गावकरी आणि भारत फोर्ज एकजुटीने प्रयत्नशील आहेत आणि त्यातून गावाचा कायापालट होत आहे.

### टेलिमेडिसिन सुविधा म्हणजे काय?

सर्वसामान्यांना कोणताही अतिरिक्त आर्थिक भार सोसावा न लागता देशांतर्गत स्तरावर कोठेही चांगल्या दर्जाच्या प्राथमिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे, सुविधांचा दर्जा सुधारणे, आणि आरोग्यसुविधा वितरणाचा खर्च कमी करणे, यासाठीचा आदर्श उपाय म्हणजे टेलिमेडिसिन सुविधा! टेलिमेडिसिन सुविधांमधून व्हिडिओ कॉलद्वारे ग्रामीण भागांतील अगदी शेवटच्या घटकापर्यंत प्राथमिक आरोग्य सुविधा व वैद्यकीय मार्गदर्शन पोहोचविता येते.

### टेलिमेडिसिन सुविधा पुरविण्याचा घेतला ध्यास

टेलिमेडिसिन सुविधा क्षेत्राला मान्यता मिळाल्यानंतर वर्ष २०२१ मध्ये बाबासाहेब कल्याणी यांच्या सक्षम मार्गदर्शनांतर्गत आणि डोअरस्टेप हेल्थ सर्व्हिसेसच्या सहकार्याने भारत फोर्जने महाराष्ट्रात पुणे व सातारा जिल्ह्यांत सॅटेलाईट सुविधेच्या साहाय्याने टेलिमेडिसिन सुविधेचा शुभारंभ केला. पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील ठाकरेवाडी, चिखली, फडाळेवाडी येथील वाड्या वस्त्यांवर तसेच सातारा जिल्ह्यातील कोरेगाव तालुक्यातील धामणेर, कण्हेरखेड, रुई, नागझरी व जयपूर अशा एकूण आठ गावांमध्ये ८ टेलिमेडिसिन सेवा केंद्रे उभारून भारत फोर्जने महाराष्ट्रातील टेलिमेडिसिन सुविधांचा भक्कम पाया रचला. या सर्व गावांतील व वाड्यांतील लोक अतिशय हलाखीचे जीवन जगत असून वैद्यकीय सुविधांपासून वंचित आहेत. रोजची भाजी भाकरी मिळवण्यासाठी येथील लोकांना रात्रीचा दिवस करावा लागतो. अशा परिस्थितीत त्यांना त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याप्रति जागरूक करणे हे मोठे आव्हान होते.

### अशी लावली सवय

वरील गावांत व्हिडिओ कॉलद्वारे वैद्यकीय मार्गदर्शन घेण्याची सवय ग्रामस्थांना लावणे व या सुविधेप्रति त्यांच्या मनात विश्वास निर्माण करणे आवश्यक होते. त्यासाठी भारत फोर्जने प्रत्येक टेलिमेडिसिन केंद्रात दोन अनुभवी स्थानिक परिचारिकांची नियुक्ती केली. त्यांच्याशी गावकरी परिचित असल्याने आधुनिक टेलिमेडिसिन सुविधा आणि पारंपरिक वैद्यकीय सुविधा यांमधील अंतर कमी झाले आणि ग्रामस्थ या केंद्रांशी जोडले गेले. आजार, आणि उपचारांबरोबरच औषधे मिळण्याची सुविधा येथे असल्याने गावकऱ्यांच्या मनात विश्वास निर्माण करण्यात भारत फोर्जला यश आले. या केंद्रांमुळे प्राथमिक उपचार मिळवण्यासाठी ग्रामस्थांना करावी लागत असलेली पायपीट थांबली आहे. एकूण ८ गावांमध्ये यशस्वीपणे राबवल्या जात असलेल्या टेलिमेडिसिन सुविधेचा लाभ भारत फोर्जने आजवर ३८,७९७ गावकऱ्यांना दिला आहे.

### भारत फोर्जच्या टेलिमेडिसिन सुविधेचे फायदे

दुर्गम, अतिदुर्गम भागात Outreach programme च्या माध्यमातून आरोग्यसुविधेचा थेट लाभ

ग्रामस्थांच्या आरोग्यविषयक जागरूकतेत वाढ. विशेषत: सकस आहार आणि पुरेशा व्यायामाचे महत्त्व गावकऱ्यांना कळले.

सर्दी, खोकला, ताप, असे किरकोळ आजार आणि छोट्यामोठ्या जखमांवर तात्काळ इलाज व औषधोपचार शक्य. तात्काळ उपचारांमुळे हातावर पोट असलेल्या अनेक कुटुंबांची रोजंदारी बुडण्याचा धोका कमी. आर्थिक स्थैर्य लाभण्यासाठी अत्यंत उपयुक्त सेवा

हृदयविकार, मधुमेह, यांसारख्या गंभीर आजारांचे वेळेत निदान होऊन रुग्णास त्वरित जवळच्या रुग्णालयात उपचारांसाठी भरती करता आले.

'टेलिमेडिसिन या भारत फोर्जने दिलेल्या आरोग्य सुविधेमुळे आमच्या आदिवासी भागाला खूप फायदा झाला. रोजंदारीवर काम करणाऱ्या, मोलमजुरी करणाऱ्या गरीब वर्गासाठी ही सुविधा खूप महत्त्वाची वाटते. भीमाशंकर खोऱ्यात वसलेल्या आमच्या आदिवासी जनतेला त्यांची उपजीविकेची सुविधा फार महत्त्वाची वाटते. पण कामावर गेल्यानंतर त्यांना होणारे आजार, थकवा, साथीचे रोग, इ.मुळे त्यांचे शारीरिक नुकसान तर होतेच, आणि त्यांना आर्थिक झळही सोसावी लागते. परिणामी, टेलिमेडिसिन सुविधा त्यांना खूपच महत्त्वाची वाटते. या सुविधेमुळे येथील लोकांमध्ये जागरूकता निर्माण झाली आणि छोट्यामोठ्या आजारांपासून बचाव होऊ लागला आहे. भारत फोर्जचे मनापासून आभार!'

आशा खंडू पारधी
सरपंच, ठाकरवाडी, पुणे

### ग्रामीण महाराष्ट्राची जीवनवाहिनी सुविधा

ग्रामीण महाराष्ट्रातील अतिशय दुर्गम भागातही तात्काळ वैद्यकीय मार्गदर्शन उपलब्ध करून देणारी ही टेलिमेडिसिन सेवा ग्रामस्थांसाठी जीवनदायी ठरत आहे. किरकोळ आणि गंभीर आजार तसेच तातडीच्या परिस्थितीत वैद्यकीय सल्ला व मार्गदर्शन या सुविधेमधून मिळू शकते. याखेरीज, दूरस्थ पद्धतीने घेतली जाणारी आरोग्यविषयक मार्गदर्शक सत्रे, रुग्णांसाठी फिजिओथेरपी व्यायाम, आणि हिमोग्लोबीन व रक्तातील साखरेची तपासणी अशा कार्यक्रमांचे आयोजनही या केंद्रांमध्ये केले जाते.

आपत्कालीन परिस्थिती हाताळता यावी, म्हणून टेलिमेडिसिन केंद्रांवर कार्यरत कर्मचारी आणि ग्रामस्थांना कंपनीतर्फे कृत्रिम श्वासोच्छ्वास (सीपीआर) प्रशिक्षणही दिले जाते.

टेलिमेडिसिन केंद्रांवरील ऑनलाईन मार्गदर्शन सत्रांचा लाभ ग्रामस्थांना होताना दिसत आहे. स्तनांचा कर्करोग, संधिवात, रक्तक्षय (ॲनिमिया) इत्यादी महत्त्वपूर्ण आजारांबरोबर फ्रॅक्चर झाल्यास काय करावे, याबद्दलची माहिती, काळजी आणि प्रतिबंधनाविषयी तज्ज्ञ डॉक्टर ग्रामस्थांना मार्गदर्शन करतात. याशिवाय, भारत फोर्जचे सीएसआर कर्मचारी गावोगावी भेटी देऊन टेलिमेडिसिन सुविधांचा लाभ घेण्याविषयी ग्रामस्थांना उत्तेजन देत असतात.

### ग्रामीण भारताच्या आरोग्यदायी जीवनासाठी आशेचा किरण

आरोग्यसंपन्न भारताच्या निर्माणासाठी भारत फोर्जने सुरू केलेल्या टेलिमेडिसिन सुविधांचा लाभ आजवर येथील तब्बल १६,८६६ ग्रामस्थांनी घेतला असून दर्जेदार आरोग्य सुविधांवर आपलाही अधिकार आहे, ही सुखद जाणीव त्यांच्यामध्ये निर्माण होत आहे.

जागतिक महासत्ता होण्याच्या प्रवासात भारतीयांना दर्जेदार आरोग्यसुविधा देण्यास भारत कटिबद्ध असल्याचे आश्वासक चित्र निर्माण करण्याचे काम शासनाबरोबरच आपलेही आहे, असे भारत फोर्ज मानते. या दृष्टीने टेलिमेडिसिन सुविधा उपलब्ध करून देऊन भारत फोर्जने ग्रामीण भागाला आशेचा किरण दाखवला आहे. यापुढेही ग्रामीण भारताचे आरोग्य चित्र अधिकाधिक निरामय करण्याकामी भारत फोर्ज आपले योगदान देतच राहील.

# कमजोर उद्योगक्षेत्रांकडे लक्ष हवे!

**'क्रिसिल'** या पतमानांकन संस्थेने औद्योगिक क्षेत्राचे प्रतिनिधित्व करणाऱ्या बारा उद्योगक्षेत्रांच्या कामगिरीमध्ये सुधारणा अपेक्षित असल्याचे म्हटले आहे. भारताने वित्तीय शिस्त बऱ्यापैकी ठेवली असून जगातील आघाडीच्या देशांमध्ये भारताचे स्थान कायम राहील, अशा शब्दांमध्ये जागतिक नाणेनिधीनेही अलीकडेच प्रशंसा केली आहे. मात्र यामुळे हुरळून न जाता, कमजोर पडलेली उद्योगक्षेत्रे भरभराटीस आणण्यासाठी प्रयत्न करायला हवेत.

लोकसभा निवडणुकांचे पर्व सुरू असल्यामुळे, सत्ताधारी पक्ष अर्थव्यवस्थेचे गुलाबी चित्र रंगवत असेल, तर त्यात आश्चर्य नाही. कोणत्याही पक्षाचे सरकार असले तरी असेच घडते. निवडणुकांच्या वेळी आश्वासनांची पोतडी लोकांपुढे उघडली जाते. परंतु निवडणुका संपल्यानंतर ती आश्वासने विसरली जातात किंवा वास्तवाचा विचार करून त्यांना कात्री लावली जाते. मात्र सध्या देशातील कॉर्पोरेट क्षेत्राची स्थिती काय आहे, हे पाहण्याची गरज आहे. याचे कारण, शेतीची स्थिती समाधानकारक नाही आणि शेतकरी किमान हमीभावासाठी लढत आहेत. अशा वेळी उद्योग क्षेत्राकडून अर्थव्यवस्थेची अधिक अपेक्षा आहे. भारतीय कंपन्यांकडून २०२३-२४ च्या जानेवारी ते मार्च या चौथ्या तिमाहीमध्ये केवळ चार ते सहा टक्के महसूलवृद्धी नोंदवली जाण्याची शक्यता आहे. हे आकडे थोडे उशिरा समोर येतात. सप्टेंबर २०२१ नंतरची ही सर्वात कमी अशी ही महसूलवाढ आहे.

भारतातील 'क्रिसिल' या अग्रगण्य पतमानांकन संस्थेने औद्योगिक क्षेत्राचे प्रतिनिधित्व करणाऱ्या ४७ कंपन्यांच्या कामगिरीचे परीक्षण केले तेव्हा केवळ बारा उद्योगक्षेत्रांच्या महसुलात सुधारणा करणे अपेक्षित आहे, असे आढळले. मुख्यतः उपभोग्य उत्पादने आणि सेवांनी जानेवारी ते मार्च या तिमाहीमध्ये चांगल्या कामगिरीचे प्रदर्शन करणे अपेक्षित आहे. प्रवासी वाहनांच्या वाढत्या विक्रीमुळे आणि गेल्या वर्षांत किमतीत वाढ झाल्यामुळे वाहननिर्मिती क्षेत्राच्या कामगिरीला चालना मिळाली आहे. तसेच संघटित किराणा क्षेत्र हे सलग तेरा महिने प्रगती दर्शवत आहे. परंतु बांधकाम संबंधित क्षेत्रांमधील महसूल कमी येणे वाढण्याची भीती आहे. शहरांमध्ये रिकाम्या फ्लॅट्सची संख्या भरपूर असून मागणीही कमी आहे. त्यामुळे किमती दबावखाली आहेत.

एकंदरीत भविष्यकाळात योग्य पावले टाकल्यास, व्यापार-उद्योगाची स्थिती नक्की बदलू शकते. उद्योगधंद्यांना वेळेवर आणि पुरेसे भांडवल आवश्यक असते आणि नियमित कर्जपुरवठा होणेदेखील गरजेचे असते. ३१ मार्च २०२४ अखेरीस उद्योग आणि सेवाक्षेत्रांना मिळणाऱ्या कर्जामध्ये साडेबारा टक्क्यांची वाढ झाली आहे. रिझर्व्ह बँकेच्या ताज्या अहवालानुसार, उद्योगांकडून येणे असलेल्या बँक कर्जाची एकूण रक्कम ८२ लाख कोटी रुपये इतकी आहे. मागच्या वर्षी ही आकडेवारी ७१ लाख कोटी रुपये एवढी होती. एचडीएफसी बँक आणि एचडीएफसी लिमिटेड यांच्या एकत्रीकरणानंतर नव्या खासगी कंपनीची क्षमतादेखील वाढली आणि कर्जपुरवठासुद्धा. यातील बड्या उद्योगांना होणाऱ्या कर्जवाटपात मागच्या वर्षी तीन टक्क्यांची वाढ होती, तर २०२३-२४ मध्ये हे प्रमाण सात टक्क्यांवर गेले आहे. दूरसंचार क्षेत्रातल्या कंपन्यांनाच २७ टक्के अधिक कर्जाचे वाटप करण्यात आले आहे. गेल्या काही वर्षांमध्ये इन्फ्रास्ट्रक्चर फायनान्स कंपन्यांमधील काही कंपन्या या ऊर्जाक्षेत्रावर भर देत आहेत. या कंपन्यांना सरकारी योजना आणि सवलतींचाही फायदा होतो. बँका एकूण कर्जपुरवठ्यातील ५५ टक्के कर्जे अशा कंपन्यांना देतात. वर्षभरात हा हिस्सा १४ टक्क्यांनी वाढला आहे. त्यात बजाज फायनान्ससारखी आघाडीची वित्तीय कंपनी आता पुन्हा जोमाने काम करू शकेल. याचे कारण १५ नोव्हेंबरला रिझर्व्ह बँकेने डिजिटल कर्जविषयक मार्गदर्शक तत्त्वे आणि आवश्यक तरतुदींचे पालन न केल्यामुळे कंपनीच्या ईकॉम आणि इन्स्टा ईएमआय कार्ड या दोन योजनांवर निर्बंध घातले होते. आता हे निर्बंध हटवण्यात आल्यामुळे दोन्ही व्यवसाय विभागांमध्ये तेजी येणार आहे.

अर्थव्यवस्थेत खाजगी गुंतवणुकीप्रमाणेच सार्वजनिक गुंतवणूकदेखील होणे महत्त्वाचे असते. सरकारने सर्वच क्षेत्रांमधून अंग काढून घेतल्यास संकटे निर्माण होऊ शकतात. भारतीय अर्थव्यवस्थेसाठी सार्वजनिक गुंतवणूक हा एक महत्त्वाचा प्रेरणादायी घटक आहे आणि त्यामुळेच भारत ही जगातील सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था बनली असल्याचे मत आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने व्यक्त केले आहे. सार्वजनिक गुंतवणूक ऐतिहासिकदृष्ट्या विशिष्ट वस्तू, पायाभूत सुविधा किंवा सेवा प्रदान करण्याच्या गरजेतून उद्भवली आहे. ती राष्ट्रीय हिताची आहे. औद्योगिकीकरणाचा परिणाम म्हणून सार्वजनिक गुंतवणुकीमध्ये वाढ झाली आहे आणि शहरी समुदायांच्या वाढीसाठी नवीन पायाभूत सुविधांची मागणी आहे. एकविसाव्या शतकाच्या शेवटी, राज्य उद्योगांचे खासगीकरण आणि बाजारांच्या नियंत्रणमुक्तीमुळे खासगी आणि गैरनफा क्षेत्रांद्वारे प्रदान केलेल्या वस्तू आणि सेवांवर सार्वजनिक खर्चात वाढ झाली. सार्वजनिक गुंतवणूक हा भारतीय अर्थव्यवस्थेसाठी एक महत्त्वाचा चालक घटक आहे. या कारणामुळेच ती जगातील सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था बनली आहे. आशिया आणि प्रशांत क्षेत्रातील अनेक अर्थव्यवस्थांमध्ये ऊर्जेच्या किमती कमी झाल्यामुळे महागाई नरमण्याची शक्यता आहे; मात्र अन्नधान्याच्या किमतीचा दबाव कायम आहे, असे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या टिप्पण्यांमध्ये म्हटले आहे.

'आयएमएफ'ने या महिन्याच्या सुरुवातीला २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी वाढीचा अंदाज ६.५ टक्क्यांवरून ६.८ टक्क्यांपर्यंत वाढवला होता आणि २०२५-२६ साठी ६.५ टक्के वाढीचा अंदाज कायम ठेवला होता. भारत आणि फिलिपिन्स देशांतर्गत लवचिक मागणीमुळे सकारात्मक वाढ कायम राखू शकले. 'आयएमएफ'ने आशिया-प्रशांत प्रादेशिक वाढीचा अंदाज ४.५ टक्क्यांपर्यंत वाढवला आहे; जो सहा महिन्यांपूर्वीच्या तुलनेत ०.३ टक्क्यांनी वाढवण्यात आला आहे. उदयोन्मुख बाजारपेठांमध्ये महागाई मोठ्या प्रमाणात आटोक्यात राहणे अपेक्षित आहे. ऊर्जेच्या किमती कमी झाल्यामुळे अनेक अर्थव्यवस्था महागाईमध्ये आणखी घसरणाचा अनुभव घेऊ शकतात तर भारतामध्ये तांदळाच्या बाबतीत डिसइन्फ्लेशन म्हणजे किमती घसरण्याचा वेग तात्पुरता मंदावण्याची शक्यता आहे. म्हणजेच अल्पावधीसाठी चलनवाढीचा ताण कमी होण्याची आशा आहे. आशियाई देश विनिमय दराच्या चढ-उताराचा सामना करण्यासाठी पूर्वीपेक्षा अधिक चांगल्या स्थितीत आहेत; मात्र उच्च कर्ज, व्याज खर्चाचे ओझे कमी करण्यासाठी आणि मध्यम-मुदतीच्या संरचनात्मक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी वित्तीय एकत्रीकरणास प्राधान्य देणे आवश्यक आहे. वित्तीय एकत्रीकरण म्हणजेच अर्थसंकल्पीय तूट कमी करण्यासाठी आणि अर्थव्यवस्थेच्या आकाराशी संबंधित कर्जपातळी स्थिर करण्यासाठी सरकारने आवश्यक उपायोजना करणे गरजेचे आहे. भारतात सार्वत्रिक निवडणुकीचे वर्ष असूनही वित्तीय शिस्त कायम ठेवण्यात आली आहे. यामुळे अर्थव्यवस्थेची कामगिरी चांगली राहणार असून जगातील आघाडीच्या देशांमध्ये भारताचे स्थान कायम राहील, असेही आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने कौतुकाने म्हटले होते.

स्वातंत्र्योत्तर काळात अनेक पायाभूत क्षेत्रांमध्ये खासगी गुंतवणूक येत नव्हती. कारण त्यात फारसा नफा मिळणार नव्हता. अशा वेळी पंडित जवाहरलाल नेहरूंनी विविध क्षेत्रांमध्ये सार्वजनिक उद्योग-धंदे स्थापन केले. आता नव्याने सार्वजनिक उपक्रम स्थापण्याची गरज नाही. परंतु खासगी गुंतवणूक अजिबातच येत नसलेल्या क्षेत्रांमध्ये प्रथम सरकारने गुंतवणूक करणे किंवा सार्वजनिक आणि खासगी भागीदारी प्रकल्प स्थापन करणे अथवा खासगी कंपन्यांना आवश्यक ते भागभांडवल उपलब्ध करून देणे, या बाबी जरूरीच्या आहेत. भारताने वित्तीय शिस्त बऱ्यापैकी ठेवली असून, जगातील आघाडीच्या देशांमध्ये भारताचे स्थान कायम राहील, अशा शब्दांमध्ये नाणेनिधीने प्रशंसा केली आहे. परंतु यामुळे हुरळून न जाता, कमजोर पडलेली उद्योगक्षेत्रे भरभराटीस आणण्याच्या दृष्टीने सरकारने उपाययोजना केल्या पाहिजेत. त्यातूनच उद्याच्या सक्षम अर्थव्यवस्थेचे स्वप्न पेलणे भारताला शक्य होणार आहे.

**- हेमंत देसाई, ज्येष्ठ पत्रकार.**

# पुणे पोर्शे अपघात असो किंवा अन्य अपघात; गुन्हेगारांवर कठोर कारवाई व्हावी

**पुण्यात** अलिशान पोर्शे कारखाली दोन जणांना चिरडणाऱ्या अल्पवयीन मुलाचे वडील बिल्डर विशाल अग्रवाल हाच मुख्य गुन्हेगार आहे असे मला वाटते.रहिसजाद्या बापाने अल्पवयीन मुलीला कार दिलीच नसती तर हा अपघात नक्कीच टळला असता.परंतु पोराला बापाच्या कमाईवर जास्तच घमंड आणि बापाला पैशाचे घमंड असल्यामुळे अय्याशीसाठी त्याने पोर्शे कारचा आणि बापाच्या पैशांचा दुरूपयोग केला व दोघांचा अपघात करून मृत्यूच्या खाईत लोटले.त्यामुळे पुण्यामध्ये संतापाचे वातावरण दिसून येते.परंतु विशाल अग्रवालसह त्यांच्या मुलाला घोर पापाचे प्रायश्चित्त अवश्य भोगावे लागेल.कारण अपघात हा अपघात असतो त्याला माफी नसावीच यामध्ये तो अल्पवयीन आहे किंवा सधण्यान याची पर्वा न करता कायद्याच्या चौकटीतून कठोर कारवाई झाली पाहिजे जेणेकरून सर्वांचेच डोळे उघडतील व अपघाताच्या बाबतीत सतर्कता निर्माण होईल.आश्चर्याची गोष्ट म्हणजे ज्या मुलाजवळ ड्रायव्हींग लायसन्स नाही,गाडी नवीनच परंतु त्या गाडीवर नंबर प्लेट नव्हती.त्यामुळे गाडीची आरटीओकडे नोंद न करता ती रस्त्यावर कशी काय आली असाही मोठा प्रश्न उपस्थित होतो आणि नशेत धुंद असणारा मुलगा दोन कोटींची कार चालवितो याचाच अर्थ असा की विशाल अग्रवालच्या मुलाला बापाच्या पैशांचा माज जास्त आला असावा.परंतु यात अनिस अवधीया व अश्विनी कोस्टा या दोघांना श्रीमंत बापाच्या मुलाने चिरडले व त्यांचा जीव गेला यामुळे मृतांच्या परिवारात शोककळा पसरली.या निरअपरांधांचा जीव तर परत येणार नाही.परंतु या अपराधी रहिसजाद्या बापलेकांना कठोर शिक्षा व्हायला हवी जेणेकरून रहिसजाद्याची पैशाची गरमी लवकर उतरेल.गरीब व सर्वसामान्यांना ज्याप्रमाणे कायद्याच्या चौकटीतून शिक्षेच्या यातना भोगाव्या लागतात त्यापेक्षाही कठोर शिक्षा हिट अँड रन या केसमध्ये सर्वांनाच व्हायला पाहिजे.कारण सुरक्षा यंत्रणेच्या माध्यमातून, पोलिस यंत्रणेच्या माध्यमातून व कायद्याच्या चौकटीतून श्रीमंतांना सुध्दा सर्वसामान्यांना सारखी सजा होणे गरजेचे आहे. पुणे पोर्शे अपघात हा अत्यंत गंभीर व संवेदनशील गुन्हा आहे. सरकारने हेही लक्षात ठेवले पाहिजे की फक्त पुणे पोर्शे अपघाताला बाऊ न करता राज्यासह देशातील संपूर्ण हिट अँड रन अपघातांवर अंकुश लागायला हवा.

अपघात हा अपघातच असतो आणि राज्यासह देशात दिवसेंदिवस हिट अँड रन अपघातांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे.अल्पवयीन मुलाला बाप बारमध्ये आणि पबमध्ये जाण्याची परवानगी देतो तो बाप नसुन एक मोठा गुन्हेगार आहे.अल्पवयीन मुलाचा जामीन रद्द झाला ही कायद्याच्या चौकटीतून चांगली बाब आहे. त्याला आता बालसुधारगृहात राहावे लागणार यापुर्वीच्या निर्णयात या मुलाला जामीन मंजूर करण्यात आला होता.परंतु आता बाल न्याय मंडळाने त्याचा जामीन रद्द केला आहे. त्यामुळे त्याची रवानगी बालसुधारगृहात करण्यात आली आहे.कारचालक हा अल्पवयीन जरी असला तरीही घडलेला अपघात हा अत्यंत भयावह आहे.त्यामुळे फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून ताबडतोब कारवाई व्हावी व अल्पवयीन मुलाला व मुख्य गुन्हेगार त्याचे वडील या दोघांना कठोर कारवाई करून उचीत शिक्षा झाली पाहिजे व मृतांच्या परिवाराला योग्य न्याय मिळायला हवा.त्याचप्रमाणे राज्यातील बार व पबमध्ये अल्पवयीन मुलांना परवानगी देणाऱ्या मालकांवर कठोर कारवाई केली पाहिजे व आतापासूनच या कामाला सरकारने व स्थानिक प्रशासनाने आगेकूच करायला हवी व पालकांनी सुध्दा आपल्या मुलांना कायद्याचा पाठ शिकवावा आणि अल्पवयातील गुन्ह्यांपासुन मुलांना दुर ठेवावे यामुळे अपघातावर आळा घालण्यास सरकारला मोठी मदत होईल.

**- रमेश कृष्णराव लांजेवार**
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)

# जेतवन बुद्ध विहारात विविध कार्यक्रमानी भगवान गौतम बुद्धाना अभिवादन



वैजापूर, दि. २३ (प्रतिनिधी) - वैशाख पौर्णिमा अर्थात बुद्ध पौर्णिमा गुरुवार(ता.२३) दिनी लाडगाव रस्त्यावरील जेतवन बुद्ध विहारात बुद्ध वंदना, खिरदान, बारावीत उत्तीर्ण झालेल्या गुणवंतांचा सत्कार, गुणवंत व्यक्तींचा सत्कार असे विविध कार्यक्रम आयोजित करून तथागत भगवान गौतम बुद्धांना अभिवादन करण्यात आले. आरंभी भगवान गौतम बुद्ध यांच्या मूर्ती समोर मेणबत्ती द्वीप प्रज्वलित करण्यात आले. पुष्प ही अर्पण करण्यात आले व अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी श्रीमती शांताबाई सिद्धार्थ भुईंगळ, सिद्धार्थ तुकाराम भुईंगळ, सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत, जयप्रकाश बोरगे, निर्मला बोरगे (जाधव), सुंदरबाई जाधव, जिजाबाई त्रिभुवन, कुंदनबाई थोरात, शांताबाई अंभोरे, सुनंदाताई ठोकळ, पंचशीला त्रिभुवन, संकेत ठोकळ, श्रीमती गायकवाडताई यांच्यासह महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. जेतवन बुद्ध विहारच्या वतीने निर्मला जाधव व सुनंदा ठोकळ यांनी शासनाने दोन मनाचे पुरस्कार देऊन सन्मानित केलेले सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांचा सत्कार केला.

# दक्षिण अरबी समुद्रात मान्सूनचे आगमन; 'या' राज्यांत बरसणार पावसाच्या सरी

मुंबई, दि. २३ (प्रतिनिधी) - मान्सूनच्या आगमनाची चातकासारखी वाट पाहत असणाऱ्यांसाठी आनंदाची माहिती मिळत आहे. नैऋत्य मौसमी पाऊस म्हणजे मान्सूनची अनुकूल वातावरणामुळे वेगाने आगेकूच सुरु आहे. दक्षिण अरबी समुद्रात मान्सूनचे आगमन झाले असून काही राज्यांत मुसळधार पावसाच्या सरी बरसणार असल्याचा इशारा हवामान विभागाने वर्तवला आहे. तसेच येत्या काही दिवसांत केरळमध्येही हे नैऋत्य मौसमी वारे वाहण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. त्यामुळे आता पाऊसप्रेमींची उत्सुकता शिगेला पोहोचली असून लवकरच पावसाचा आनंद घेता येईल असो हवामान विभागाकडून सांगण्यात आले आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, नैऋत्य मौसमी वाऱ्यांनी आज दक्षिण अरबी समुद्र आणि मालदीवचा काही भाग, कोमोरिन क्षेत्र, दक्षिण बंगालचा उपसागर, अंदमान व निकोबार बेट तसेच अंदमान समुद्राचा भाग व्यापला आहे. नैऋत्येला लागून असलेल्या पश्चिम बंगालच्या उपसागरावर कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले आहे. येत्या दोन दिवसात म्हणजेच २४ मे पर्यंत ते बंगाल उपसागराच्या मध्यवर्ती भागांवर तीव्र कमी दाबाचे क्षेत्र तयार करतील, असे हवामान विभागाने म्हटले आहे.

**'या' भागात रेड अलर्ट**

या आठवड्यात दक्षिणेकडील राज्यांमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. केरळला रेड अलर्ट जारी केला असून २५ मे पर्यंत मुसळधार पाऊस येण्याची शक्यता आहे. तसेच तमिळनाडू, पाँडेचेरी, कराईकल भागांमध्ये २४ मे या कालावधीत मुसळधार पावसाची शक्यता असल्याचे हवामान विभागाने सांगितले आहे.

**'या' भागात तीव्र उष्णतेची लाट**

पुढील पाच दिवस वायव्य भारतातील मैदानी भागात तीव्र उष्ण लाटेची स्थिती कायम राहण्याची शक्यता हवामान विभागाने दिली आहे. दरम्यान, पंजाब, हरियाणा, दिल्ली, राजस्थान, गुजरात, पश्चिम-उत्तर मध्य प्रदेशातील काही भागात तीव्र उष्णतेच्या लाटा वाहणार आहेत. तर हिमाचल प्रदेशातील शिवालिक टेकड्यांच्या भागात तीव्र उष्णता कायम राहणार असे हवामान विभागाने सांगितले आहे.

# पुणे अपघातप्रकरणी अमृता फडणवीसांनी व्यक्त केला तीव्र संताप



मुंबई, दि. २३ (प्रतिनिधी) - पुण्यात एका अल्पवयीन मुलाने मद्यधुंद अवस्थेत कार चालवत दोघांना चिरडल्यामुळे सर्वत्र खळबळ उडाली आहे. या घटनेतील आरोपी मुलगा वेदांत अग्रवाल हा १७ वर्षांचा असून पुण्यातील बांधकाम व्यावसायिक विशाल अग्रवाल यांचा मुलगा आहे. त्यामुळेच त्याच्यावर ठोस कारवाई अद्यापही करण्यात आली नाही, असा आरोप केला जात आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे उपमुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषद घेत आतापर्यंत झालेल्या संपूर्ण कारवाईची माहिती दिली. या कारवाईदरम्यान, ज्युवेनाईल जस्टिस बोर्डने अनपेक्षित भूमिका घेतल्याचे समजले. त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी याबाबत तीव्र संताप व्यक्त केला आहे.

आरोपीचे वय १७ वर्षे व ८ महिने असल्यामुळे निर्भयाकांडानंतर कायद्यात झालेल्या अमेंडमेंटनुसार आरोपीला प्रौढ समजून खटला चालवण्यास परवानगी द्यावी, अशा प्रकारे पुणे पोलिसांनी ज्युएनाईल जस्टिस्ट बोर्डकडे ॲप्लिकेशन केलं होतं. दुर्दैवाने ज्युएनाईल जस्टिस्ट बोर्डने हे ॲप्लिकेशन केवळ सीन आणि फाईल्ड केल्याने पोलिसांसाठीही हा धक्का ठरला, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली. यावर पुणे पोलिसांनी वरच्या कोर्टात केलेल्या अर्जानंतर ज्युएनाईल जस्टिस्ट बोर्डला ऑर्डर रिन्यू करण्यास सांगितले आहे.

या संपूर्ण प्रकारावर अमृता फडणवीस यांनी परखड मत मांडलं आहे. दोन निष्पाप जीवांचा यात बळी गेल्यामुळे त्यांनी संताप व्यक्त करत आरोपीवर कठीण कारवाईची मागणी केली आहे. एक्स अकाऊंटवर एक पोस्ट करत त्यांनी लिहिलं आहे की, 'पुण्यातील अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या अनिश अवधिया आणि आश्विनी कोष्टा यांच्या कुटुंबियांप्रती माझ्या सहवेदना आहेत. पण यातील प्रमुख आरोपीला कठोर शिक्षा व्हायला हवी. बाल न्याय मंडळानं त्याला दिलेला जामीन हा लाजीरवाणा निकाल आहे', असं त्या म्हणाल्या आहेत.

# पी.एन. पाटील यांच्या जाण्याने एक सहृदयी नेतृत्व काळाच्या पडद्याआड – मुख्यमंत्री

मुंबई, दि. २३ (प्रतिनिधी) - कोल्हापूरमधील येथील आमदार पी. एन. पाटील यांच्या जाण्याने एक सहृदयी नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे, अशी भावना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली. त्यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत वेदनादायी आणि धक्कादायक असल्याचे सांगून त्यांनी पी. एन. पाटील यांना श्रद्धांजली अर्पण केली. तसेच त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाला दिले आहेत.

मुख्यमंत्री शोकसंदेशात म्हणतात की, कोल्हापूर शहरात सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात केलेल्या कामाच्या बळावर त्यांनी जनतेच्या मनात एक वेगळे स्थान निर्माण केले होते.

एक सजग नेतृत्व, धडाडीचा लोकप्रतिनिधी, स्थानिक प्रश्नांची उत्तम जाण आणि ते सोडवण्यासाठी ते सदोदित आग्रही असायचे. शेतकरी, पुनर्वसन, कामगार, मागासवर्गीयांचे प्रश्न सोडवण्यासाठी त्यांचा सतत पाठपुरावा सुरू असायचा. त्यांच्या जाण्याने कोल्हापूर जिल्ह्यातील सामजिक, राजकीय क्षेत्राची मोठी हानी झाली आहे.

कालच त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजल्यावर त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली होती. त्यानंतर त्यांचा मुलगा राहुल पाटील यांच्याशी बोलून प्रकृती जरा स्थिर झाल्यास त्यांना एअर ?म्ब्युलन्सने मुंबईला आणून त्यांच्यावर उपचार करण्याचे निश्चित करण्यात आले होते. मात्र आज सकाळी त्यांची प्राणज्योत मलवल्याचे वेदनादायक वृत्त मला समजले. मी पी. एन. पाटील यांचे कुटुंबिय, सहकारी आणि कार्यकर्त्यांच्या दुःखात सहभागी आहे. कोल्हापूरच्या रांगड्या मातीतल्या या सहृदयी नेतृत्वाला भावपूर्ण श्रद्धांजली.

# भारतात पैशाची नाही, प्रामाणिक नेत्यांची कमतरता- नितीन गडकरी

नागपूर, दि. २३ (प्रतिनिधी) - 'भारतात पैशांची कमतरता नाही. पण देशासाठी प्रामाणिकपणे काम करणाऱ्या नेत्यांची कमतरता आहे', असे विधान केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी चंदीगड येथे बोलताना केले. रस्ते, महामार्ग आणि पायाभूत सुविधा यांचे निर्माण करण्यासाठी नितीन गडकरी झपाटून काम करतात, हे याआधी अनेकदा दिसले आहे. पायाभूत सुविधा उभारताना प्रशासनातील लाल फितीच्या कारभारावर त्यांनी अनेकदा बोट ठेवले आहे. प्रशासनासह ते पुढाऱ्यांवरही बोलायला कमी करत नाहीत. चंदीगडमध्ये बोलत असताना त्यांनी देशाला प्रामाणिक नेते हवे असल्याचे म्हटले.

नितीन गडकरी म्हणाले, 'मी १९९५ साली युतीची सत्ता असताना मी मंत्रीपद भुषविले. आज तुम्ही मुंबईत गेल्यास तुम्हाला वरळी-वांद्रे सी लिंक दिसेल. तो तयार करण्याचे भाग्य मला मिळाले. मुंबईत ५५ पूल तयार केले. मुंबई-पुणे महामार्ग तयार करण्याची जबाबदारी मी पार पाडली. तेव्हा माझ्याकडे फक्त पाच कोटी होते. पैशांची कमतरता होती. त्यावेळी रिलायन्सचे ३६०० कोटींचे टेंडर मी रद्द केले. आज त्याची किमंत ४० हजार कोटींच्या घरात आहे. मी ते टेंडर रद्द केल्यानंतर खूप वाद झाला. सर्वात कमी किंमत त्यांनी दिली होती, अशी टीका माझ्यावर झाली. पण मला सांगायला आनंद होतो की, आम्ही कॅपिटल मार्केटमध्ये गेलो. एमएसआरडीसी सारखी संस्था निर्माण केली. आम्ही बाजारातून पैसे उभे केले. आम्ही ६५० कोटी जमवायला गेलो होतो, पण आम्हाला ११५० कोटी मिळाले. या एका प्रसंगाने मला शिकवले की, देशात पैशांची कमतरता नाही.'

नितीन गडकरी पुढे म्हणाले की, आम्ही तीन-चार महिन्यापूर्वी एनएचएआय इन्फ्रास्ट्रक्चर इनव्हेस्टमेंट ट्रस्ट कंपनीला बीएसइ वर सूचीबद्ध केले. केवळ सात तासांत आमचा बाँड प्रचंड विकला गेला. आमच्या सहकाऱ्यांकडून मला तातडीचे बोलावणे आले. मी गोव्याहून मुंबईत गेलो आणि बीएसई इमारतीमधील बेल वाजवून बाँड बंद केला. सात पटीने अधिक त्याची विक्री झाली होती. पैशांचा पाऊस पडला. मी ५० लाख कोटींचे काम केले आहे. तरीही आणखी २० ते २५ लाख कोटींचे काम मी करू शकलो असतो, पण ते झाले नाही, याची सल माझ्या मनात आहे.

नितीन गडकरी यांची संपत्ती किती?

नितीन गडकरी पुन्हा एकदा नागपूर लोकसभा मतदारसंघातून निवडणुकीसाठी उभे आहेत. नागपूर लोकसभा मतदारसंघासाठी पहिल्या टप्प्यात १९ एप्रिलला मतदार पार पाडले. उमेदवारी अर्ज भरत असताना गडकरी यांनी प्रतिज्ञापत्राद्वारे आपल्या संपत्तीची माहिती दिली होती. त्यांनी २८ कोटी रुपयांची जंगम आणि स्थावर मालमत्ता जाहीर केली आहे. त्यांची संपत्ती गेल्या पाच वर्षांत १० कोटींनी वाढली आहे.

# भरडधान्य पिकांच्या पुस्तिकेमध्ये शिफारशी, सुधारणा सुचविण्याचे कृषी विभागाचे आवाहन

मुंबई, दि. २३ (प्रतिनिधी) - भरडधान्य, पौष्टिक तृणधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकांचे क्षेत्र, उत्पादन व उत्पादकता वाढविण्यासाठी कृषी विभागामार्फत पुस्तिका तयार करण्याचे काम सुरू आहे. या पुस्तिकेत या पिकांचे पेरणीपासून काढणीपर्यंतचे लागवड तंत्रज्ञान, कीड रोग व्यवस्थापन याविषयी माहिती देण्यात येणार आहे.

या पुस्तिकेच्या मजकुराचा क्युआर कोड सोबत देण्यात येत आहे. या पुस्तिकेमध्ये काही शिफारशी, सुधारणा तसेच अतिरिक्त माहिती द्यावयाची असल्यास कृषी आयुक्तालयाच्या ddinfor@gmail.com या ई-मेलवर कळविण्यात याव्यात, असे आवाहन कृषी आयुक्तालयाचे कृषी संचालक (विस्तार व प्रशिक्षण) विकास पाटील यांनी केले आहे.

# नवनवीन संकल्पना राबवून प्रशासनातील अधिकाऱ्यांनी राज्याच्या विकासात योगदान द्यावे - राज्यपाल रमेश बैस

सातारा, दि. २३ (प्रतिनिधी) - प्रशासनातील अधिकाऱ्यांनी नवनवीन संकल्पना राबवून राज्याच्या विकासात योगदान द्यावे, असे प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी केले. महाबळेश्वर येथे राज्यपाल रमेश बैस यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांची बैठक घेतली. यावेळी राज्यपाल यांच्या सहसचिव श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्य अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक समीर शेख, अप्पर जिल्हाधिकारी जीवन गलांडे ,अप्पर पोलीस अधीक्षक आंचल दलाल, उपवनसंरक्षक आदिती भरद्वाज, जलसंपदा विभागाचे अरुण नाईक, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. युवराज करपे, निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

सातारा जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येत असलेल्या विविध प्रकल्प, उपक्रम यांचा सखोल आढावा घेत असताना राज्यपाल श्री. बैस यांनी शिक्षण, आरोग्य, पर्यटन विकास, बांबू लागवड अदीविषयांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. जिल्हा परिषदेच्या शाळांमधील पायाभूत सुविधा आणि विद्यार्थ्यांचा शैक्षणिक गुणवत्ता विकास यासाठी राबविण्यात येत असलेल्या मॉडेल स्कूल या उपक्रमाबाबत माहिती घेत असताना श्री. बैस यांनी जिल्हा परिषदेच्या शाळांची वर्गवारी ही उपलब्ध पायाभूत सुविधांच्या आधारे करत असतानाच विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेच्या आधारेही करावी. यामध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचा विकास करण्यासाठी पूरक वातावरण निर्माण करावे. त्यासाठी शाळांच्या स्पर्धा आयोजित कराव्यात. ज्या शाळा चांगली कामगिरी करतील त्यांना शासनामार्फत पुरस्कार देण्यात यावेत, असे सांगितले.

या उपक्रमाबाबत बारकाईने जाणून घेत असताना त्यांनी मॉडेल स्कूलच्या निर्मितीसाठी येणारा खर्च, जिल्ह्यातील



एक शिक्षकी शाळांची संख्या, शाळांमध्ये प्रयोगशाळा, संगणक लॅबची उपलब्धता आदींबाबत माहिती घेतली. विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या मध्यान्ह भोजनाचा दर्जा तपासणी नियमितपणे व्हावी व विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे मध्यान्ह भोजन मिळेल याबाबत दक्षता घेण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. सध्याच्या काळात मुलांच्या शारीरिक हालचाली कमी झाल्या आहेत. मैदानी खेळांमधील सहभाग कमी झाला आहे. त्यामुळे शाळांमध्ये मुलांच्या क्रीडा विकासावर जाणीवपूर्वक भर देण्याची सूचनाही त्यांनी यावेळी केली.

जिल्ह्याच्या पर्यटन विकासाला चालना देण्यासाठी एकात्मिक धार्मिक, ऐतिहासिक, पर्यावरण पूरक पर्यटन विकास आराखडा राबविण्यात येत असून यामधून किल्ल्यांचा विकास करत असताना अर्काइव्हलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाची मदत घेण्यात यावी, अशी सूचना राज्यपाल श्री. बैस यांनी केली. जिल्ह्यातील प्रायोगिक तत्त्वावर करण्यात येत असलेल्या बांबू लागवडीचा आढावा घेत असताना श्री. बैस म्हणाले, बाजारपेठेच्या दृष्टीने किफायतशीर ठरणाऱ्या बांबूच्या प्रजातींची लागवड करावी. बांबूपासून असंख्य प्रकारच्या वस्तू तयार करण्यात येतात. याचे व्यावसायिक प्रशिक्षण स्थानिकांना देऊन त्यांचा उत्पन्न स्तर वाढविण्यासाठी प्रयत्न केले जावेत. पावसाळ्यापूर्वी शेतकऱ्यांच्या बैठका घेऊन त्यांना फळ रोपे, शेवगा यासारखी रोपे मोफत उपलब्ध करून द्यावीत. शेतकऱ्यांनी या रोपांची लागवड करून त्यांचे संगोपन करावे व त्यापासून मिळणारे उत्पन्न हे शेतकऱ्यांनाच देण्यात यावे. जिल्ह्यात अनेक ठिकाणी उजाड माळराने आहेत. त्या ठिकाणी अशाप्रकारे वृक्ष लागवडीचे सूक्ष्म नियोजन करण्यात यावे.

जिल्ह्यात मुबलक प्रमाणावर दगड उपलब्ध आहेत अशा वेळी एखादी अंगणवाडी संपूर्णतः दगडी बांधकामाची अशी तयार करण्यात यावी. जिल्ह्यात प्रायोगिक तत्त्वावर टसर सिल्क प्रकल्प राबविण्यात येत आहे. यात सहभागी असणाऱ्या शेतकऱ्यांना सिल्क धागा तयार करण्यासाठी प्रोत्साहन व प्रशिक्षण देण्यात यावे. बांबूपासूनही धागा तयार करण्याच्या दृष्टीने प्रकल्प राबवावेत, अशा सूचना राज्यपाल श्री.बैस यांनी यावेळी दिल्या. या बैठकीत जिल्हाधिकारी श्री. जितेंद्र डुडी यांनी जिल्ह्याचा संपूर्ण आढावा सादर केला. यामध्ये जिल्ह्यात राबविण्यात येत असणारा मॉडेल स्कूल या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाबरोबरच स्मार्ट पीएचसी ,जिल्ह्याचा एकात्मिक धार्मिक, ऐतिहासिक, पर्यावरण पूरक पर्यटन विकास आराखडा, बांबू लागवड उपक्रम, अभिनव अंगणवाडी, टसर सिल्क उत्पादन प्रकल्प, आदींबाबत सविस्तर माहिती दिली. पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी पोलीस विभागाच्या कामकाजाबाबत माहिती दिली.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# मुख्यमंत्र्यांनी घेतला टंचाई उपाययोजनांचा आढावा

छत्रपती संभाजीनगर दि.२३ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर विभागातील दुष्काळ व पाणीटंचाईच्या पार्श्वभुमिवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज आढावा घेतला. पिण्याच्या पाण्यास सर्वोच्च प्राधान्य , चारा उपलब्धतेच्या उपाययोजना व आगामी मॉन्सूनपूर्व उपाययोजना राबविण्याचे निर्देश त्यांनी यंत्रणांना दिले.

विभागातील सर्व जिल्ह्यातील दुष्काळी उपाययोजनांबाबत आज विभागीय आयुक्त कार्यालयात आढावा घेण्यात आला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन, पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील, आरोग्य मंत्री डॉ. तानाजी सावंत, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, आ. हरिभाऊ बागडे,आ. रमेश बोरनारे, आ. संजय शिरसाट, मुख्यसचिव डॉ. नितीन करीर, विभागीय आयुक्त मधुकरराजे अर्दड, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, तसेच जालना, हिंगोली, बीड, लातूर, धाराशीव, नांदेड, परभणी या जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी दुरदृष्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते. तसेच बैठकीत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, तसेच अन्य जिल्ह्यातील मुख्य कार्यकारी अधिकारी, जलसंधारण,



विभागीय आयुक्त अर्दड यांनी विभागातील स्थितीचे सादरीकरण केले. त्यात माहिती देण्यात आली की, विभागात ६८ तालुके आणि ३५४ महसूल मंडळांचा दुष्काळग्रस्त तालुके व मंडळ म्हणून समावेश करण्यात आला आहे. या सर्व क्षेत्रात दुष्काळी सवलती लागू करण्यात आल्या आहेत. त्यात २८ लाख ७२ हजार ६७४ शेतजमिन धारकांना ४२ कोटी २३ लक्ष रुपयांची सूट महसूलात देण्यात आली आहे. ८ लाख ७८ हजार ४१५शेतकरी हे पीक कर्ज पुनर्गठनास पात्र आहेत. १० लाख १८ हजार ९२६ शेतजमिन धारकांच्या एकूण ८६२९ कोटी रकमेच्या कर्ज वसूलीस स्थगिती देण्यात आली आहे. तसेच ८ लाख ३९ हजार ७५५ खातेदारांना थकित ४७७ कोटी ६० लक्ष रुपयांच्या वीज बिलात एकूण ३१० कोटी १५ लक्ष रुपयांची सुट देण्यात आली आहे. विभागातील ५ लाख ७ हजार ९६१ विद्यार्थ्यांना २३ कोटी ९ लक्ष रुपयांची परीक्षा शुल्क सवलत देण्यात आली आहे. विभागात २ लाख ६ हजार ४६० कामे शेल्फवर असुण त्यात ३ कोटी ८६ लक्ष २८ हजार १८९ मनुष्यदिवस कामाची क्षमता आहे. १२८९ गावे, ५१२ वाड्यांमध्ये १८३७ टॅंकर्सद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. तसेच ३१८१ विहिरी अधिग्रहित करण्यात आल्या आहेत. याशिवाय वीज पुरवठा खंडीत न करणे, नैसर्गिक आपत्तीत झालेल्या नुकसानीपोटी व पिक विमाअंतर्गत मदतीचे वाटप केले जात आहे, अशी माहिती देण्यात आली. सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी आपापल्या स्थितीबाबत माहिती दिली.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्या जिल्ह्यातील मागणी केलेल्या गावांना पुरेसे टॅंकर तात्काळ द्यावेत. प्रस्ताव आल्यास तीन दिवसांत टॅंकर सुरु करावा. पाण्याचा दर्जा, गुणवत्ता तपासण्यात यावा.गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या नळ पाणीपुरवठा योजनांचे थकीत बिल वसूली तूर्त बाजूला ठेवून नवीन कनेक्शन द्या, मात्र कुठल्याही परिस्थितीत पाणीपुरवठा योजनांचा वीज पुरवठा बंद करु नये. गावांमधील ग्रामसेवक, तलाठी यांच्या बैठका घेवून गावनिहाय मागणी जाणून घ्या. चारा उगवणीसाठी दिलेल्या अनुदानातून चारा उत्पादन झाले आहे. हा चारा पशुपालकांसाठी उपलब्ध आहे. त्याची माहिती पशुपालकांपर्यंत पोहोचवा. भूजल पातळीत झालेली घट लक्षात घेता जलसंधारण उपाययोजना राबवाव्या.

टॅंकरग्रस्त गावांमध्ये विहीरी, बोअरवेल पुनर्भरण तसेच जल संधारण उपाययोजना राबवाव्या, जेणेकरुन भविष्यात त्या गावात टॅंकरने पाणीपुरवठा करण्याची आवश्यकता भासू नये. 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' मोहिमेला गती द्या पावसाळ्यापूर्वी ही मोहिम राबवा. त्यासाठी स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य घ्या. कोणत्याही परिस्थितीत पिण्याच्या पाण्याला, चारा, जनावरांना पाणी देण्यास सर्वोच्च प्राधान्य द्या. अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून घ्या. पावसाळापूर्व कामे पूर्ण करा. पावसामुळे गावांचा संपर्क तुटणार नाही, अन्न धान्ये, औषधे यांचा पुरेसा साठा असेल याची दक्षता घ्या. अनधिकृत, नियम बाह्य होर्डिंग्ज कापून टाका, संबंधितांवर गुन्हे दाखल करा. तसेच अधिकृत होर्डिंग्जचे स्ट्रक्चरल ऑडीट करा. राज्य आपत्ती व्यवस्थापन प्रतिसाद दल, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्रतिसाद दल यांच्याशी समन्वय राखा.खरीप हंगामाच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना बोगस बियाणे पुरवठा रोखण्यासाठी भरारी पथके नियुक्त करा, विक्रेते, पुरवठादार यांचेवर गुन्हे दाखल करा. जिल्हाधिकाऱ्यांच्या स्तरावर निरीक्षण दल तयार करा. वीज कोसळून होणारे मृत्यू रोखण्यासाठी वीजरोधक प्रणाली बसवा, असे निर्देश मुख्यमंत्री शिंदे यांनी दिले.

# मराठवाड्यातील केशरला जागतिक स्तरावर बाजार उपलब्ध करून देणार

## संजय कदम यांची ग्वाही; आंबा महोत्सवाला सुरूवात

छत्रपती संभाजीनगर दि.२३ (प्रतिनिधी)- फळाचा राजा आंब्याला स्थानिक ते आंतरराष्ट्रीय पातळीवर मागणी आहे. गुजरातचा आंबा निर्यातीत पुढे आहे. त्याच धर्तीवर मराठवाड्यातील केशर आंब्याला जागतिकस्तरावर बाजारपेठ उपलब्ध करून देण्यावर विशेष भर दिला जात आहे, अशी माहिती कृषी व पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी गुरुवारी दिली. ते आंबा महोत्सवात बोलत होते. उद्घाघाटनापूर्वी ६०० किलो आंबा ग्राहकांनी खरेदी करून नेला.

कृषी उत्पन्न बाजार समिती, कृषी पणन मंडळ, महाकेशर आंबा बागायतदार संघ आणि मॅंगो ग्रोअर्स असोसिएशन यांचे संयुक्त विद्यमान जाधवाडी पिसादेवी रोडवरील समितीच्या जागेवर २३ ते २६ मे दरम्यान ४ दिवस आंबा व मिलेटस (भरडधान्य व तृणधान्य) महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचे उद्घाघाटन गुरूवारी सकाळी



११ वाजता आमदार हरिभाऊ बागडे व कार्यकारी संचालक संजय कदम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संचालक गणेश दहिहंडे, जगन्नात काळे, डॉ. भगवान कापसे, डॉ. मुकेश बारहाते, उपसरव्यवस्थापक गजानन वाघ आदी उपस्थित होते.

पुढे कदम म्हणाले की, आंबा महोत्सव आता काही नवीन राहिलेला नाही. २० वर्षापूर्वी पुण्यात याची सुरूवात झाली होती. यातून आंबा उत्पादक शेतकरी व ग्राहक थेट खरेदी विक्री करतात. त्यामुळे मधली लूट थांबते. गुणवत्तापूर्ण व दर्जेदार आंबा मिळतो. त्यामुळे राज्यभरात कृषी उत्पन्न बाजार समितीत आंबा महोत्सव भरवला जातो. मात्र, निर्यातीत गुजरातचा केशर पुढे आहे. त्याच्या पुढे मराठवाडा केशर गेला पाहिजे. यावर आपल्याला सर्वांनाच काम करावे लागणार आहे. त्या गुणवत्तेचा आंबा उत्पादन झाले तर जागतिक स्तरावर बाजारपेठ उपलब्ध आहेत. शासन निर्यातीसाठी मदत करते. त्याचा फायदा तुम्हाला घेता येईल.

पणन मंडळाने बाजार समितीची ५० एकर जागा घेतली आहे. त्यावर ते स्वत काही विकास करत नाहीत. त्यामुळे हि जागा परत करावी, अशी मागणी आमदार हरिभाऊ बागडे यांनी केली. या जागेवर आम्ही विकास करून दाखवू, अशी ग्वाही बागडे यांनी दिली. त्यांच्या विधानाचा विरोधी पक्षाचे संचालक जगन्नाथ काळे यांनी चांगलाच समाचार घेत, यांना जागा विकासासाठी नव्हे तर विक्रीसाठी पाहिजे असेल. जळगाव रोडवरील जागेवर विकास करण्याऐवजी ती बिल्डराच्या घश्यात घालण्याचा प्रयत्न सुरू केल्याचेही ते म्हणाले.

## माणिकचंद सेठी यांचे निधन



छत्रपती संभाजीनगर दि.२३ (प्रतिनिधी)- खंडेलवाल दिगंबर जैन समाजातील ज्येष्ठ सदस्य तथा नंदादीप हौसिंग सोसायटी बन्सीलालनगर येथील रहिवासी माणिकचंदजी नारायणदास सेठी धोडराई वाला वय ९२ यांचे २२ मे रोजी रात्री अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. धार्मिक वृत्तीचे आणि विविध सामाजिक ,धार्मिक संस्थेवर पदाधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यांचा वर २३ मे रोजी आयोध्या नगरी स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले, त्यांच्या पश्चात तीन मुले, चार मुली, सुना नातवंडे असा परिवार आहे ते पि यु जैन शाळेचे अध्यक्ष महावीर सेठी तथा उद्योजक प्रकाश, राजेंद्र सेठी यांचे ते वडील होत.

## काळजी घ्या ! दुपारी बाहेर जाणे टाळा, रविवारपर्यंत असणार कडक ऊन

छत्रपती संभाजीनगर दि.२३ (प्रतिनिधी)- मागील आठ दिवसांपासून बदलत्या हवामानानुसार छत्रपती संभाजीनगर शहर आणि जिल्ह्याच्या तापमानात सतत चढउतार होत आहे. आठ दिवसांपासून ४० अंशांच्या खाली असलेले तापमान मंगळवारी अचानक वर गेले.

चिकलठाणा वेधशाळेने दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी शहराचे तापमान ४१.६ अंश सेल्सिअसपर्यंत वाढले होते. तर जिल्हा हवामान केंद्राने दिलेल्या अहवालानुसार, रविवारपर्यंतचे सर्व दिवस कडक तापमानाचे असतील. यामुळे शक्यतो दुपारी उन्हात जाण्याचे टाळावे, असा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे. पैठण रोडवरील कृषी विज्ञान केंद्राच्या छत्रपती संभाजीनगर जिल्हा हवामान केंद्राने दिलेल्या माहितीनुसार छत्रपती संभाजीनगर शहर आणि तालुक्यात २२ मे रोजीचे तापमान जास्तीत जास्त ४३.१ अंश सेल्सिअस असेल. तर कमीत कमी ३०.१ अंश असेल. २३ मे रोजी तापमान कमी होण्याचा अंदाज वर्तविण्यात आला.

## निवृत्त वरिष्ठ भूवैज्ञानिक श्री मनोहर सदाशिव दुपारे यांचे निधन



छत्रपती संभाजीनगर दि.२३ (प्रतिनिधी)- येथील निवृत्त वरिष्ठ भूवैज्ञानिक श्री मनोहर सदाशिव दुपारे (७१) यांचे औरंगपूरा येथील निवासस्थानी हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. पुष्पनगरी येथील स्मशानभुमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या प्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवर, नागरिक उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा असा परिवार आहे. ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी ताराबाई लड्डा यांचे ते जावई होते.

(पान १ वरुन)

### बुडालेल्यांचा शोध घेण्यासाठी गेलेल्या...

गणेश मधुकर देशमुख असे सहा जण बुडाले. धुळे एसडीआरएफ बलगट क्रमांक ६ चे पोलिस उपनिरीक्षक प्रकाश शिंदे, पोलिस शिपाई वैभव वाघ व पोलीस शिपाई राहुल पावरा या तिघांचा मृत्यू झाला आहे. त्यांच्या या दुर्दैवी मृत्यूमुळे पोलीस दलासह जिल्ह्यात हळहळ व्यक्त केली जात आहे. तर पंकज पंढरीनाथ पवार, अशोक हिम्मतराव पवार कॉन्स्टेबल या दोघांना वाचवण्यात यश आले आहे. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती सध्या स्थिर आहे. तसेच गणेश मधुकर देशमुख (वाकचौरे) आणि अर्जुन रामदास जेडगूले यांचा शोध अद्याप सुरु आहे.

### उजनी धरणात बुडालेल्या ६ जणांचे मृतदेह सापडले

सोमवारी सापडली. जवळपास ३५ फूट खोल पाण्यात ही बोट सापडली होती. मात्र ६ जण बेपत्ताच होते. अखेर आज सकाळी त्यांचे मृतदेह सापडले.

या दुर्घटनेतील गोकुळ दत्तात्रय जाधव ( ३०), कोमल गोकुळ जाधव ( २५), माही गोकुळ जाधव (३), शुभम गोकुळ जाधव (१८, सर्व रा. झरे ता. करमाळा) अनुराग ज्ञानदेव अवघडे (२६), गौरव धनंजय डोंगरे (२४) यांचा शोध लागला असून सहाही जण मृत्युमुखी पडले आहेत. त्यांचे मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी करमाळा ग्रामीण रुग्णालयात पाठवले असून त्यानंतर नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात येणार आहेत.

### उद्धव ठाकरेंच्या 'त्या' पत्रकार परिषदेची...

याची तपासणी करण्यासाठी निवडणूक आयोगाने त्यांच्या विधानांचे मराठीत भाषांतर मागितल्याचीही माहिती आहे.

दरम्यान, सोमवारी मुंबईत संथ मतदानाची अनेक उदाहरणे समोर आल्याने उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केले होते. सरकार लोकांना मतदानापासून परावृत्त करत असल्याचे त्यांनी म्हंटले होते. यानंतर मुंबई भाजपचे अध्यक्ष आशिष शेलार यांनी निवडणूक आयोगाकडे तक्रार केली. उद्धव ठाकरेंनी निवडणूक आदर्श आचारसंहितेचे उलंघन केले आहे आणि निवडणूक अधिकाऱ्यांना धमकावले आहे, असे आशिष शेलार यांनी म्हंटले होते.

### शरद पवार यांना सुप्रिया सुळे यांच्या विजयाचा...

दिला. लोकसभेला अवघ्या ४८ जागा होत्या. माझा पक्ष छोटा होता. पण तो जनमाणसांत रुजलेला आहे. त्यानंतरही आम्ही कमी जागा घेतल्या. अधिकाधिक जागा घेऊन त्या जिंकून आणण्याची क्षमता आमच्यात होती. पण ३ पक्ष एकत्र असल्यामुळे सामंजस्य राखणे महत्त्वाचे होते. ते आम्ही राखले. पण विधानसभा निवडणुकीत २८८ जागा आहेत. त्यावेळी एकमेकांना समजून घेणे सोपे जाईल. त्यात राष्ट्रवादी मोजक्या जागा घेणार नाही, असे ते म्हणाले.

### अरूण गवळी यांच्या सुटकेला राज्य सरकारचा विरोध

यांनी नुकतेच येथे जाहिर केले होते. गीता गवळी या मला बहिणीप्रमाणे असून अरुण गवळी ऊर्फ डॅडी यांच्याप्रमाणेच अखिल भारतीय सेनेच्या कार्यकर्त्यांना मीही प्रेम देईन. मी आता अखिल भारतीय सेनेतील एक सदस्य झालो असल्याचे समजावे, असे वक्तव्य नार्वेकर यांनी केले होते. राहुल नार्वेकर हे लोकसभा निवडणुकीसाठी इच्छुक होते. त्यामुळे त्यांनी प्रचाराचा भाग म्हणून अरुण गवळींना मानणारा वर्ग आकर्षीत करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, महायुतीच्या जागा वाटपात हा मतदार संघ शिवसेनेला सुटल्यामुळे राहुल नार्वेकर यांची इच्छा अपूर्ण राहिली.

दक्षिण मुंबईमधील लालबाग, परळ, भायखळा, करीरोड, दगडी चाळ, सातरस्ता, माजगाव या भागात अरूण गवळीला मानणारा मोठा वर्ग आहे. हा वर्ग आपल्याकडे वळवण्यासाठी महायुती सरकारने अरूण गवळीच्या सुटकेचा आदेश काढल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होती. २००४ साली दक्षिण मध्य मुंबई लोकसभा मतदारसंघातून अरुण गवळीने शिवसेनेच्या मोहन रावले यांच्याविरोधात लोकसभेची निवडणूक लढवली होती. तर त्यावेळचे राष्ट्रवादीचे नेते आणि अरूण गवळीचे भाचे सचिन अहिरही त्यावेळी निवडणुकीच्या रिंगणात होते. त्यावेळी अरूण गवळीला ९२ हजार मते मिळाली होती. त्यावेळी सचिन अहिर आणि अरुण गवळी यांना मिळालेल्या मतांचा आकडा हा निवडून आलेल्या सेनेच्या मोहन रावले यांच्या मतांच्या आकड्यापेक्षा जास्त होता.

# सोयगावला ४६ हजार ८५२ पाठ्य पुस्तकांचा पुरवठा; शाळेच्या पहिल्याच दिवशी मिळणार विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके

सोयगाव दि.२३ (प्रतिनिधी)- जिल्हा परिषदेच्या मोफत पाठ्यपुस्तक योजना २०२४ - २५ अंतर्गत सोयगावला इयत्ता पहिली ते आठवीच्या तेरा हजार ५७४ विद्यार्थ्यांसाठी बुधवारी सोयगाव पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी विभागाला ४६ हजार ८५२ पुस्तकांचा पुरवठा करण्यात आला आहे त्यामुळे शैक्षणिक सत्राच्या पहिल्या च दिवशी पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत पुस्तकं मिळणार असल्याचे गटशिक्षणाधिकारी रंगनाथ आढव यांनी सांगितले आहे.

यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून जिल्हा परिषदेच्या सोयगाव तालुक्यातील १२० प्राथमिक शाळा सेमी इंग्रजी होणार आहे त्यामुळे सेमीच्या विद्यार्थ्यांना चार हजार तिनशे साठ पुस्तके प्राप्त झाली आहे तर मराठी माध्यमाची ३९ हजार ५४७ पुस्तके प्राप्त झाली आहे उर्दू माध्यमाच्या विद्यार्थ्यांना ही २ हजार ९४५ पुस्तके सोयगाव ला प्राप्त झाली आहे. दरम्यान ही मोफत पाठ्य पुस्तक योजना पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी आहे.

सोयगाव तालुक्यात जिल्हा परिषदेच्या १२० प्राथमिक शाळा आहे. पहिल्या वर्गासाठी शाळा सुरू होण्यापूर्वी च पहिल ीच्या वर्गात १५०५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. शाळापूर्व प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यामुळे पहिली च्या १५०५ विद्यार्थ्यांसह उर्वरित इयत्तेच्या तेरा हजार ५७४ विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके मिळणार असून गटशिक्षणाधिकारी कार्यालयात प्राप्त पुस्तकं येत्या तीन दिवसात केंद्रास्तरावर पुरवठा करण्यात येणार आहे. याकामी गटशिक्षणाधिकारी रंगनाथ आढाव, परमेश्वर कठोरे, सुनील बावचे, सचिन पाटील आदी पुढाकार घेत आहे.

# बजरंग सोनवणेंना निवडणूक आयोगाची नोटीस; तर पंकजा मुंडेंनाही सूचना

## प्रचार खर्चात तफावत आढळल्याने उमेदवार अडचणीत

बीड दि.२३ (प्रतिनिधी)- लोकसभा निवडणूकीच्या काळात प्रचारासाठी सादर केलेल्या खर्चामध्ये तफावत आढळून आल्याने महाविकास आघाडीचे बीड लोकसभा मतदारसंघातील उमेदवार बजरंग सोनवणे यांना निवडणूक आयोगाने नोटीस बजावली आहे. त्याचबरोबर महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांना अभिलेख सादर करून तपासणी करून घ्यावीत व खर्चात तफावत राहणार नाही, याची दक्षता घेण्याची सूचना करण्यात आली आहे.

बीडमधील सर्व उमेदवारांच्या निवडणूक खर्चाच्या रेकॉर्डची तिसरी तपासणी निवडणूक खर्च निरीक्षक सुशांताकुमार बिस्वास यांनी १२ मे रोजी केली होती. या तपासणीमध्ये बजरंग सोनवणे यांनी ७ ते १० मे या कालावधीतील खर्च सादर केला. पहिल्या व दुसऱ्या खर्चातील तफावत अनुक्रमे ५ लाख ३१ हजार २९४ व ४ लाख २७ हजार अशी एकुण ९ लाख ५९ हजार २३१ ऐवढी तफावत मान्य केली. मात्र ही रक्कम नोंदवहीमध्ये समाविष्ट करून तशी नोंद घेणे आवश्यक असताना ती नोंद घेण्यात आलेली नाही. त्यामुळे ९ लाख ५९ हजार २३१ एवढी तफावत बजरंग सोनवणे यांच्या खर्चात आढळून आली.

तर दुसरीकडे पंकजा मुंडे यांच्याही खर्चाची तपासणी करण्यात आली. या कालावधीत १६ लाख ६६ हजार ४३१ एवढ्या रकमेची तफावत दिसून आली. तर ३ मे १० मे या कालावधीत एकूण २० लाख ९४ हजार ४० एवढ्या रकमेची तफावत आढळून आल्याने मुंडे यांना नोटीस बजावली होती. नोटिसीमध्ये दर्शविलेल्या रकमेची तफावत पंकजा मुंडे यांनी मान्य केली. दरम्यान, ही रक्कम खर्चात समाविष्ट करुन निवडणूक खर्च नोंदवही तपासणीसाठी सादर करून तपासणी करून घ्यावी, तफावत राहणार नाही याची काळजी घेण्याच्या सूचना त्यांना करण्यात आल्या आहेत.

## गुरुवारी गुंतवणूकदार मालामाल! निफ्टी पहिल्यांदाच २२८०० च्या पुढे, सेन्सेक्सही ७७० अंकांनी वधारला!

मुंबई दि.२३ (प्रतिनिधी)- एकीकडे लोकसभा निवडणुकीमुळे बाजारात काहीशी अस्थिरता आहे. मात्र आज २३ मे २०२४ रोजी शेअर बाजारात मोठी तेजी पाहायला मिळाली. आज इतिहासात पहिल्यांदाच निफ्टीने २२८०० अंकाच्याही पुढे झेप घेतली. तर सेन्सेक्समध्येही ८१६ अंकांची तेजी पाहायला मिळत आहे.

शेअर बाजारात गेल्या तीन दिवसांत खास काही घडलं नाही. मात्र गुरुवारचा दिवस शेअर बाजारात मोठ्या घडामोडी घडल्या. हा दिवस गुंतवणूकदारांसाठी खास ठरला. या दिवसाच्या सुरुवातीपासून बाजारात तेजी पाहायला मिळाली. पुढे मुंबई शेअर बाजार तसेच राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देश चढाच राहिला. मुंबई शेअर बाजार अर्थात सेन्सेक्स बुधवारी ७४,२२१ अंकांवर बंद झाला होता.

तर गुरुवारी हाच बाजार ७४,२५३ वर चालू झाला. अचानकपणे या निर्देशांकात सकारात्मक बदल दिसायला लागले. सकाळी ११.३० वाजता बीएसई ४४४.२३ अंकांनी उसळून थेट ७४,६६५.२९ वर पोहोचला आहे. दुपारी १.१२ वाजता बीएसई ८१६.८५ अंकांच्या तेजीसह ७५०३७.९१अंकांवर पोहोचला.

आज गुरुवारी बाजार चालू झाल्यानंतर निफ्टी २२६१४ अंकांवर होता. काही क्षणांत हा निर्देशांक २२८०० अंकांवर पोहोचला. बुधवारी निफ्टी २२,५९७.८० अंकावर बंद झाला होता. याआधी निफ्टीने २२८०० हा आकडा कधीही पार केलेला नव्हता. दुपारी १.१६ वाजता निफ्टीने २२८३६.८५ अंकांपर्यंत झेप घेतली. बाजार बंद होईपर्यंत निफ्टी आणि सेन्सेक्समध्ये आणखी घडामोडी घडण्याची शक्यता आहे.